# माणूस


इराण विशेषांक। शनिवार । २७ जानेवारी १९७९ । ७५ पैसे

**Nor certitude, nor peace, nor help for pain;**
**And we are here as on a darkling plain**
**Swept with confused alarms of struggle and flight,**
**Where ignorant armies clash by night.**

–Mathew Arnold

व्हिक्टोरियन काळाच्या शेवटी इंग्लंडमधील सामान्य माणसाच्या मनःस्थितीविषयी अर्नोल्ड म्हणतो–

कशाचीच निश्चिती नाही, मनःशांती नाही, वेदनेवर उपायही नाही.
आणि तरीही आम्ही या मैदानावर, अंधारात, आपण नक्की कोणाशी
लढत आहोत हे कळत नसतानाच, शस्त्रास्त्रांच्या गोंधळवून टाकणाऱ्या
खणखणाटाने भारावून जाऊन लढतच आहोत.



**आज**

**इराणची स्थिती**

**याहून निराळी नाही.**

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक पस्तिसावा

२७ जानेवारी १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤


# शहा गेला ! कसोटी आताच आहे !!

आज इराणनं क्रांतीचा पहिला टप्पा पार केलेला आहे. अज्ञान, अडाणीपणा, मागासलेपणा, गरिबी आणि सुशिक्षितता, साक्षरता,बुद्धिजीवी वर्ग, उच्च मध्यम वर्गीय, श्रीमंत या प्रत्येक दोन वर्गांमध्ये कमालीची तफावत असतानादेखील इराणनं साधलेलं हे यश कौतुकास्पद आहे. कारण सत्तेशी आणि त्यातूनही सर्व सामर्थ्यवान राजसत्तेशी असा एकाकी लढा देणं ही गोष्ट सोपी नाही. त्याबद्दल इराणमधील बुद्धिजीवी वर्ग, क्रांतीमध्ये प्रत्यक्ष भाग घेतलेले आणि हुतात्मा झालेले हजारो क्रांतिवीर निश्चितच गौरवास पात्र आहेत.

पण जरा शांतपणे विचार केला तर असं लक्षात येईल की, कोणत्याही देशात क्रांतीचा पहिला टप्पा गाठणं फारसं कठीण नसतं. देशातील नेतृत्वाची खरी कसोटी लागते ती दुसऱ्या टप्प्यामध्ये. कारण पहिल्या टप्प्यामध्ये ध्येय किंवा उद्दिष्ट डोळयांसमोर मूर्त स्वरूपात दिसत असतं. एखाद्या व्यक्तीला खुर्चीवरून किंवा सिंहासनावरून खाली खेचायचं आहे म्हटल्यावर त्या व्यक्तीच्या खुर्चीखाली किंवा सिंहासनाखाली सुरुंग लावण्यापासून तर तिला हरप्रकारे जिणं असह्य करण्यापर्यंत वाटेल ते उपाय योजून त्या व्यक्तीला खाली खेचता येतं. इथपर्यंतचं सारं सोपं असतं; पण अशा तऱ्हेनं तिला खुर्चीवरून किंवा सिंहासनावरून खाली खेचल्यावर आणि आपण त्या खुर्चीवर किंवा सिंहासनावर जाऊन बसल्यावरच खऱ्या कसोटीला सुरुवात होते. कारण आधीच्या सत्तेकडे आपण केलेल्या मागण्या आता आपल्यालाच पुऱ्या करायच्या असतात आणि प्रत्येकजण आपल्या प्रत्येक कृतीवर बारकाईनं लक्ष ठेवून असतो, मोठ्या आशेनं आपल्याकडे पाहात असतो. आणखी एक गोष्ट या सत्ताबदलामुळे घडून येते ती म्हणजे, आधीच्या सत्तेकडून सामान्य माणसाच्या ज्या अपेक्षा असतात त्यापेक्षा नव्या येणाऱ्या सत्तेकडून त्याच्या अपेक्षा वाढलेल्या असतात आणि त्या समाधानकारकपणे पुऱ्या करण्याची फार मोठी नैतिक जबाबदारी क्रांतीच्या या दुसऱ्या टप्प्यात क्रांतिकर्त्यांवर येऊन पडते. हिटलरच्या जर्मनीमध्ये हेच घडलं, माओच्या चीनमध्ये हेच घडलं, चे गव्हेराच्या क्यूबामध्ये हेच घडलं, जनता पक्ष असलेल्या भारतामध्येही सध्या हेच घडत आहे. त्यांपैकी जे या कसोटीला उतरतात, क्रांतीचा हा दुसरा टप्पा यशस्वीपणे पार पाडतात ते देशनेते ठरतात. जे अयशस्वी होतात ते देशद्रोही ठरून त्यांचीही गत त्यांच्या आधीच्या सत्ताधीशांसारखीच होते.

या दृष्टीने विचार केला तर आज इराणमधील राजकीय परिस्थिती आणि भारतातील राजकीय परिस्थिती यांच्यामध्ये थोडंफार साम्य आढळतं. दोन्ही देशांनी अत्याचारी हुकूमशहांना आपापल्या मार्गांनी सत्तेवरून दूर केलं आहे. जे मागण्या करत होते तेच आता त्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सत्तेवर आल्याचं किंवा येत असल्याचं चित्र दोन्ही देशांमध्ये आज दिसत आहे आणि त्यामुळेच या दोन्ही देशांमध्ये नव्यानं सत्तेवर आलेल्यांच्या किंवा येत असलेल्यांच्या नेतृत्वाची, कर्तृत्वाची आत्ताच खरी कसोटी लागायला लागली आहे. त्यांचं स्थैर्य त्यांच्याच कर्तृत्वावर अवलंबून आहे. अन्यथा दोन्ही

देशांमध्ये त्यांनीच घालवून दिलेले सत्ताधीश पुन्हा सिंहासनावर उडी मारण्यासाठी संधीची वाट पाहात विंगमध्ये उभेच आहेत ! हा इराण विशेषांक काढण्याची कल्पना निघाली ती असं थोडं-फार साम्य जाणवल्यामुळेच.

इराणमध्ये येणाऱ्या नव्या नेतृत्वापुढे आणखी एक समस्या आज उभी आहे. या देशाला धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा फार मोठा वारसा आहे. जनसामान्यांवर या परंपरेचा, या जुन्या रूढींचा, रिती-रिवाजांचा आजही जबरदस्त पगडा आहे. अशा परिस्थितीत पुरोगामी विचारांची हवा इराणमध्ये खेळवणं फार कठीण आहे. शहाच्या अपयशाचं हेही एक कारण होतंच की, तो इराणी माणसाची नाडी नीट न ओळखता धडाधड पश्चिमेकडील आधुनिकतेचे प्रयोग इराणमध्ये करीत होता सामान्य इराणी माणसाची धर्मश्रद्धा– काही वेळा अंधश्रद्धादेखील, त्याचं जुन्या रूढींवरील, जुन्या रिती-रिवाजांवरील, जुन्या परंपरेवरील जबरदस्त प्रेम शहाने कधी लक्षातच घेतलं नाही. त्यामुळे त्याने इराणमध्ये अवजड यंत्रं आणली; पण सामान्य इराणी माणसाचं मन मात्र या यंत्रांच्या दात्यांमध्ये शहाने भरडून टाकलं. ज्या माणसांसाठी तो हे करत होता किंवा करत असल्याचं दाखवत होता, ती माणसं शहाला आपला म्हणायला तयार नव्हती, हे शहाचं अपयश होतं.

इराणमध्ये आज उदयाला येत असलेल्या नव्या नेतृत्वाला या मुद्द्याची गंभीरपणे दखल घ्यावी लागेल. जुनाट कल्पनांच्या जळमटातून इराणी माणसाला सोडवताना त्याच्या मनाला धक्का लागणार नाही, याची काळजी या नव्या नेतृत्वाला घ्यावी लागेल. इतकंच नव्हे, तर अशा तऱ्हेने जुन्या कल्पनांमधून, जुन्या विचारांमधून त्याला बाहेर काढल्यानंतर त्याच्यापुढे काही तरी नवी कल्पना, काही तरी नवा विचार, कर्तृत्वाची काही नवी क्षितिजं या नव्या नेतृत्वाला ठेवावी लागतील, दाखवावी लागतील की ज्या कल्पनांना तो सामान्य इराणी माणूस आपल्या म्हणेल, जे विचार त्याच्या बुद्धीला भुरळ पाडतील, जी कर्तृत्वाची क्षितिजं त्याला भरारी घेण्यास उत्तेजित करतील. इराणच्या नव्या नेतृत्वापुढे क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यातील हे एक फार मोठं आव्हान आहे. या जुन्या-नव्याचा इराणी माणसाच्या मनाला धक्का लागू न देता संगम घडवून आणण्याची फार मोठी जबाबदारी आजच्या नव्या नेतृत्वावर आहे.

शापूर बख्तियार यांना पंतप्रधानपद बहाल करून शहा आज चालता झालेला आहे. त्याची ही कृती जाता जाता भारताची फाळणी करून जाणाऱ्या ब्रिटिशांसारखीच कुटिल आहे. कारण यामुळे इराणमधला नेतृत्वाचा प्रश्न सुटला नसून त्यामध्ये आणखीनच भर पडली आहे. याचं कारण असं की, आज इराणच्या ध्वजावर केवळ चाँद नाही, केवळ विळा-कोयता नाही, केवळ मयूरसिंहासन नाही, तर ही तिन्हीही चिन्हं आज इराणच्या ध्वजावर आपला हक्क सांगत आहेत. गेली अठरा वर्षं इराणबाहेर राहून इराणमधील क्रांतीची सूत्रं हालवणारा आयातुल्ला खोमेनी हा अठ्ठ्याहत्तर वर्षांचा वृद्ध धार्मिक नेता आज बख्तियारविरुद्धच बंड करायला इराणमध्ये येऊन उभा ठाकला आहे. याच अंकात इराणमधील मार्क्सिस्ट संघटनेच्या तरुण विचारवंतांची जी मुलाखत दिली आहे त्याच्या बोलण्यातून इराणमध्ये मार्क्सिस्ट विचारप्रणालीचाही बऱ्यापैकी प्रचार होत असल्याचं दिसत आहे आणि त्याच वेळी शहाबद्दल जरी राग आणि द्वेष असला तरी मयूरसिंहासनाबद्दल प्रेम आणि अभिमान या मार्क्सिस्ट विचाराच्या तरुणातही दिसत आहे. इस्लामिक मार्क्सिस्ट अशीही एक संघटना आज इराणमध्ये अस्तित्वात आहे. Religion is the opium, given to the masses असं म्हणणाऱ्या मार्क्सच्याच नावाने इस्लामिक मार्क्सिस्ट अशी संघटना निर्माण व्हावी हीच एक क्रूर चेष्टा आहे. थोडक्यात, आज इराणमध्ये प्रचंड वैचारिक गोंधळ आहे. या वैचारिक गोंधळातून नव्या नेतृत्वाला मार्ग काढावा लागणार आहे.

म्हणजेच, शहा गेल्यामुळे प्रश्न सुटले नसून, नवीन आणि अधिक कठीण प्रश्न निर्माण झाले आहेत. शहा होता तोपर्यंत एवढं तरी बरं होतं की, रागाला, द्वेषाला, असंतोषाला वाट होती. कृतीसाठी निश्चित उद्दिष्ट होतं. आता ते नाहीसं झालेलं आहे आणि इराणमध्ये फक्त अंधारच पसरला आहे. या अंधारातूनच वाट पुसत, वाट काढत इराणच्या नव्या नेतृत्वाला पुढे जायचं आहे, सामान्य जनतेला बरोबर घेऊन पुढे जायचं आहे. कारण आता परत मागे फिरण्याचा रस्ता बंद झालेला आहे.

इराणमध्ये आता पुढे काय घडतं याकडे साऱ्या जगाचंच लक्ष लागलेलं आहे. कारण इराणमधल्या नव्या नेतृत्वावर, त्या नेतृत्वाच्या धोरणांवर सारं जगच झुलणार आहे. इराणमधला पेट्रोलचा साठा संपायला अजून एकतीस वर्षांचा अवधी आहे ! !

म्हणूनच हा इराण विशेषांकाचा खटाटोप. अंक तयार करीत असताना श्री. चंद्रशेखर पुरन्दरे आणि श्री. सतीश कामत यांचं मोठं साहाय्य झालं आहे. त्याचा आवर्जून उल्लेख केलाच पाहिजे. त्याचप्रमाणे लता भिसे, प्रवीण वाळिंबे आणि ज्यांच्याशिवाय या अंकाला पूर्णताच येऊ शकली नसती असे इराणी संघटनांचे भारतातील तरुण इराणी नेते यांचाही 'माणूस' आभारी आहे.

□



# रेझा शाह ते मोहम्मद शाह

## पंचावन्न वर्षांचा राजकीय प्रवास

सतीश कामत

गेल्या पंचावन्न वर्षांचा इराणचा इतिहास हा त्या देशाच्या इतिहासापेक्षाही त्या देशावर राज्य करणाऱ्या दोन पिता-पुत्रांच्या राजकीय जीवनाचा इतिहास आहे. त्यामध्ये देशाला फारच थोडं स्थान होतं. त्यामुळेच आज शहाला हाकलून दिल्यानंतर इराण अशा एका वळणावर उभा आहे की, जिथून मागे तर फिरता येत नाही, पण पुढे जाण्याची निश्चित दिशाही ठाऊक नाही.

व्रयाची बावीस वर्षं पुरी व्हायलाही चाळीस दिवस कमी असतानाच दुसऱ्या महायुद्धाच्या ऐन धुमश्चक्रीत राज्यपदाची धुरा अंगावर पडल्यावर अनेक प्रकारच्या चढ-उतारांवरून प्रवास करीत मोहम्मद रेझा शाह पहलवी गेल्या आठवड्यात, वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी आपला देश सोडून चालते झाले! पण हे सांगणं किंवा लिहिणं जेवढं साधं, सरळ आणि सोपं आहे तेवढा शहांचा हा प्रवास निश्चितच सोपा नव्हता. जन्मापासूनच ज्याच्या वैयक्तिक जीवनात आणि भोवतालीही असंख्य वादळं सतत उठत होती, बसत होती, पुन्हा निर्माण होत होती, त्या इराणच्या शाहचा देशत्यागही तितकाच वादळी ठरावा हे तार्किकतेलाही धरूनच आहे.

२६ ऑक्टोबर १९१९ साली तेहरानच्या एका भागात एका मध्यमवर्गीय घरात मोहम्मद रेझाचा जन्म झाला. त्या वेळी रेझा खान हे त्याचे वडील लष्कराचा वारसाच असलेल्या त्यांच्या घराण्याच्या परंपरेनुसार पर्शियन कोझॅक ब्रिगेडमध्ये स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर कर्नलच्या हुद्द्यापर्यंत पोचले होते आणि ब्रिगेडच्या हाय कमांडचे एक सदस्य होते. सबंध इराणच्याच दृष्टीने हा काळ अतिशय कठीण होता. ब्रिटन आणि रशिया या दोन वसाहतवादी सत्तांच्या कात्रीत इराण सापडला होता आणि मोहम्मद शाह (१८३४-४७), नासेरद्दीन शाह (१८४७-९६) आणि मुझफ्फरेद्दीन हे क्वाजार घराण्याचे राजे एक तर युद्धात हरले होते किंवा बराचसा भाग त्यांनी या सत्तांना जवळजवळ विकूनच टाकला होता. मुझफ्फरेद्दीननंतर सत्तेवर आलेल्या मोहम्मद अली या त्याच्या मुलाने या सर्व गोंधळात आणखीनच भर टाकली. खरं म्हणजे या वेळी इराण ब्रिटन आणि रशियांच्या घशातच जात होता; पण नेमकं याच वेळी जर्मनीनं या दोन सत्तांना आव्हान दिलं आणि या दोन बड्या सत्तांनी ३१ ऑगस्ट १९०७ रोजी एक करार करून इराणचा फार मोठा भाग आपापसात वाटून घेतला आणि उरलेल्या मधल्या भागातील 'स्वतंत्र आणि एकसंध' इराणवर मोहम्मद अली राज्य करू लागला.

अशा तऱ्हेची सौदेबाजी मान्य नसलेला Constitutionaliists चा एक गट मोहम्मद अलीच्या पित्याच्या काळापासूनच या राजसत्तेशी अंतर्गत लढा देत होता. रशियातील झारवादी सरकारने हा गट दाबून टाकण्यास मोहम्मद अलीला उत्तेजनच दिलं. त्यामुळे २३ जून १९०८ रोजी मोहम्मद अलीने 'मजलीस' या तेहरानमधील पार्लमेंटच्या इमारतीवर तोफांचा मारा चालू केला. जवळजवळ उध्वस्त झालेल्या पार्लमेंटच्या इमारतीमधून जखमी आणि मृत सभासद बाहेर काढण्यापूर्वीच अलीने मोशीर सल्तानेह या त्या वेळच्या पंतप्रधानाला सदर घटनेस Constitutionalists च जबाबदार आहेत, अशा आशयाचं एक पत्र पाठवून 'मजलीस' बरखास्त करायला लावली. साहजिकच Constitutionalists नी बंडाचा झेंडा उभारला आणि अलीच्या सैन्याशी ठिकठिकाणी चकमकी करून त्याला रशियाला पळून जायला लावलं.

हे सर्व पाहणारा कर्नल रेझा खान आतून भयंकर अस्वस्थ झाला होता.

या सबंध काळात इराणच्या दृष्टीनं एकच अत्यंत आनंददायी घटना घडली आणि ती म्हणजे, ब्रिटनच्या ताब्यात असलेल्या इराणी प्रदेशात नॉक्स डार्सी या ऑस्ट्रेलियन संशोधकाला १९०८ साली पहिला तेलाचा साठा सापडला! मस्जिद-ए-सुलेमान या ठिकाणी असलेल्या तेलाच्या विहिरीतून उत्पादनाला सुरुवात झाली आणि पहिलं महायुद्ध तोंडावर आलं असतानाच इराणमधील गुंतागुंतीच्या परिस्थितीत एक नवीन भर पडली.

पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस इराणमध्ये सर्वत्र झुंडशाहीचे राज्य चालू झालं. प्रत्येक प्रदेशातला सर्वांत गुंड माणूस हा त्या त्या प्रदेशाचा सत्ताधीश बनला. याच वेळी सर पर्सी कॉक्स या अनुभवी मुत्सद्द्याची नेमणूक तेहरानमध्ये करण्यात आली आणि नव्या अँग्लो-पर्शियन करारास इराणचा पाठिंबा मिळवण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली. त्या वेळी इराणचं सरकार आर्थिक स्थैर्यासाठी संपूर्णपणे ब्रिटनवरच अवलंबून होतं आणि त्यामुळेच लॉर्ड कर्झनच्या देखरेखीखाली तयार झालेला हा करार मंजूर झाला.

पण इराणी सरकारनं अँग्लो-पर्शियन कराराला दिलेली ही मंजुरी रेझा खानचं आयुष्यच पालटणारी ठरली. इराणमधल्या राजकीयदृष्ट्या जागृत आणि विचार करणाऱ्या लोकांच्या या सबंध प्रकरणातील सरकारची असमर्थता लक्षात आली होती. १९२० सालच्या प्रारंभी रेझा खानने या संदर्भात प्रत्यक्ष कृती करायला सुरुवात केली. त्याने त्याच्या ब्रिगेडमध्ये भरले गेलेले सत्तर रशियन अधिकारी सरळ काढून टाकले. त्यामुळे प्रथमच इराणी सैन्य हे खऱ्या अर्थाने इराणी बनलं. तसंच कर्नल क्लर्ज या ब्रिगेडच्या रशियन कमांडरलाही त्यानं डच्चू दिला. साहजिकच रेझा खान कोझॅक इन्फन्ट्रीचा ब्रिगेडिअर जनरल बनला आणि त्याच्याच विचारांचे सैन्यामध्ये असलेले अनेक अधिकारी रेझा खानभोवती गोळा झाले. त्यातच अँग्लो-इराणियन मिलिटरी कमिशनच्या लेफ्टनंट कर्नल फाजलोलाह खान या सदस्यानं ब्रिटनबरोबर इराणी सरकारनं केलेल्या अपमानास्पद कराराच्या निषेधार्थ आत्महत्या केली. यामुळे रेझा खानचा सैन्यातील सर्वोच्च अधिकारपदावर पोचण्याचा मार्ग आणखीच सुकर झाला. एव्हाना सैन्यामधले बहुतेक सर्व रशियन घालवून देण्यात आले होते आणि तत्कालीन सरकार या सर्व घटनांकडे केवळ शांतपणे बघण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हतं.

इराणमधल्या या अंतर्गत घडामोडींकडे ब्रिटनचं लक्ष होतंच. शिवाय अशा नाजुक परिस्थितीत इराण कम्युनिस्टांच्या घशात पाडण्याचा आणि त्यातूनच पुढे मध्य-पूर्वेत आणि भारतातही कम्युनिझम पसरण्याचा धोका त्या वेळच्या लॉइड जॉर्जच्या सरकारने ओळखला. त्यामुळे इराणमध्ये ब्रिटनशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्याची तयारी असलेलं बळकट सरकार येणं त्यांच्या दृष्टीने आवश्यक होतं. त्यामुळे नवे सरकार स्थापण्यासाठी सय्यद झियाएद्दीन ताबताबाय या तेहतीस वर्षांच्या तरुण आणि स्पष्टवक्त्या माणसाची निवड करण्यात आली; सय्यद झिया रेझा खानकडे लष्करी साहाय्य मागण्यासाठी आला. स्वतः रेझा खान कृतीसाठी तयार झालेला होताच. आता जर संधीचा फायदा घेतला नाही तर गोष्टी हाताबाहेर जातील हे रेझा खाननं ओळखलं आणि १६ फेब्रुवारी १९२१ या दिवशी त्याच्या नेतृत्वाखाली कोझॅक ब्रिगेडनं तेहरानकडे कूच केलं. फारशी किंमत द्यावी न लागताच २० फेब्रुवारी रात्री ११ वाजेपर्यंत रेझा खाननं शहराचा ताबा घेतला. लगेचच सय्यद झियाच्या नेतृत्वाखाली नवं सरकार स्थापन करण्यात आलं आणि रेझा खानला

युद्धमंत्री हे पद देण्यात येऊन, सोन्याची हिरेजडित तलवार देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. रेझा खान इराणी सैन्याचा प्रमुख बनला; त्याला सरदाह सेपाह असा किताबही बहाल करण्यात आला. या वेळी मोहम्मद रेझा पाच महिन्यांचा होता. दिवसभराच्या कामाने थकून भागून संध्याकाळी घरी परत आल्यावर रेझा खान आपल्या या मुलाला मांडीवर घेऊन बसायचा, त्याच्याशी खेळायचा, गप्पा मारायचा. त्या कडव्या लष्करी अधिकाऱ्याचं एकदम एका प्रेमळ पित्यामध्ये रूपांतर होऊन जात असे. ◻

सय्यद झियाच्या आर्थिक आणि राजकीय संकल्पनांबद्दल जरी रेझा खानचे त्याच्याशी मतभेद नसले तरी सय्यदचा मुत्सद्दीपणा कमी पडतोय, असं मात्र त्याला वारंवार वाटत असे. हे मतभेद पुढे असेच वाढत गेले आणि त्याची परिणती म्हणून सय्यद झियाला पंतप्रधानपद सोडून देऊन देशत्याग करावा लागला !

आता रेझा खानानं संपूर्ण सैन्याची पुनर्रचना केली आणि लवकरच निरनिराळ्या जमातींची बंडं मोडून काढून त्यानं सबंध इराणमध्ये कायद्याचं राज्य स्थापन केलं. अर्थात अजूनही रेझा खान युद्धमंत्री आणि लष्करप्रमुख या नात्यानंच सर्व सूत्र हलवत होता. याच वेळी इराणमधील संसद सभासदांशोही रेझा खानचे मतभेद होऊ लागले. हे सभासद कृतिशून्य, ऐतखाऊ, स्वार्थी, मत्सरी आणि पराभूत मनोवृत्तीचे आहेत, असं त्याला वाटू लागलं. त्यामुळे सबंध संसदेबद्दलच रेझा खानच्या मनात अविश्वास आणि तिरस्कार निर्माण होऊ लागला.

१९२४ सालच्या डिसेंबरमध्ये रेझा खाननं खुजीस्तानमधील शेख काझलचं बंड मोडून काढलं हा एक महत्त्वाचा राजकीय आणि राष्ट्रीय विजय होता. ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली वाढलेल्या आणि गुंड बनलेल्या काझलचा बीमोड केल्यामुळे सबंध इराणभर रेझा खानची प्रशंसा होऊ लागली आणि १४ फेब्रुवारी १९२५ रोजी इराणी संसदेनं एक खास कायदा करून रेझा खानला देशाचं संरक्षणमंत्रिपद बहाल केलं. थोड्याच काळात म्हणजे, ३१ ऑक्टोबर १९२५ रोजी क्वाझर या इराणमधील राज्यसत्तेचा खास लोकाग्रहास्तव अस्त झाला आणि देशाची सर्व सूत्रं रेझा खान पहलवी यांच्याकडे देण्यात आली.

या काळामध्ये इराणातही प्रजासत्ताक राज्य निर्माण करण्याची कल्पना थोडीशी रुजत होती. रेझा खानही काही काळ या कल्पनेकडे आकृष्ट झाला होता; परंतु सर्वसामान्य लोकमताचा प्रवाह मात्र राजसत्तेच्याच बाजूने होता. १९२५ च्याच डिसेंबरमध्ये शहेनशाह रेझा खान पहलवी यांना इराणच्या घटना-समितीने राजेपद बहाल केलं आणि ते त्यांच्याच घराण्याकडे वंशपरंपरेने राहील, असंही जाहीर करून टाकलं. ◻


रेझा खान शहेनशाह झाल्यावर साहजिकच मोहम्मद रेझा युवराज बनला आणि तेव्हापासून त्याचं आयुष्यच बदलून गेलं. युवराजांसाठी एक खास प्राथमिक लष्करी शाळा स्थापन करण्यात आली. या शाळेत मोहम्मदचीच भावंडं आणि लष्करातील व सरकारातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुलं शिकू लागली.

१९३१ च्या मे महिन्यात मोहम्मदचं प्राथमिक शिक्षण संपलं. या अतिशय संस्कारक्षम आणि संवेदनाक्षम वयात लहानग्या मोहम्मदवर आपल्या पित्याचीच छाप सर्वांत जास्त पडली.

युवराज नऊ वर्षांचा झाल्यावर त्याला रोज शहेनशाहांबरोबरच


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे

जेवायला बसवण्यात येऊ लागलं. कारण देशामधील सर्व घडामोडींची आपल्या मुलाला पहिल्यापासूनच पूर्ण जाणीव असावी, अशी पित्याची इच्छा होती; पण यामुळेच सामान्य कौटुंबिक जीवनापासून मोहम्मद तोडला गेला.

याच काळात रेझा शाहव्यतिरिक्त आणखीही एका व्यक्तीची छाप युवराजावर पडली. ती व्यक्ती म्हणजे मॅडम आर्फा. मॅडम आर्फा ही एक फ्रेंच नर्स युवराजांची खास देखभाल करण्यासाठी नेमण्यात आली होती. तिच्याबद्दल स्वतः मोहम्मद शहांनीच पुढे असं म्हटलं की, 'आर्फाने माझ्यावर दोन प्रकारे उपकार केले. एक तर तिच्यामुळे फ्रेंच भाषा माझ्या मातृभाषेइतक्या सफाईदारपणे मी लिहू–बोलू लागलो; पण त्यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे, पाश्चिमात्य संस्कृतीचे दरवाजे आर्फानेच प्रथम मला उघडून दाखवले.'


मोहम्मद सात वर्षांचा असतानाच त्याच्या आयुष्यात लागोपाठ असे दोन–तीन प्रसंग घडले की, त्यामुळे त्याचा धर्मावर दृढ विश्वास बसला. मोहम्मद टायफॉइडने बराच आजारी होता. त्याची प्रकृती चिंताजनक बनली होती. अशा स्थितीत मोहम्मद एकदा झोपला असताना त्याला एक स्वप्न पडलं. स्वप्नात महंमद पैगंबराचा प्रमुख दूत अली त्याच्यासमोर उभा राहिला आणि त्याने मोहम्मदला वाडग्यातून काही तरी पेय प्यायला दिलं. त्याने ते प्यायलं आणि दुसऱ्याच दिवसापासून मोहम्मद झपाट्याने बरा होऊ लागला.

याच वर्षी सुट्टीमध्ये युवराज इमाम झादेह दाऊद या तेहरानच्या उत्तरेकडील पर्वतराजींमधील निसर्गरम्य ठिकाणी सहलीसाठी गेला होता. तो स्वतः चालण्याच्या किंवा घोड्यावर बसण्याच्या दृष्टीने अगदीच लहान असल्याने एका लष्करी अधिकाऱ्याने त्याला आपल्या घोड्यावर पुढ्यात बसवलं आणि ते निघाले. इतक्यात त्या अधिकाऱ्याचा घोडा घसरला, युवराज खाली फेकला गेला आणि एका दगडावर आपटून बेशुद्ध झाला; पण त्याला इजा काहीच झाली नाही. नंतर शुद्धीवर आल्यावर युवराजाने सांगितलं की, तो खाली पडत असतानाच त्याला असं जाणवलं की, अब्बास या शिया पंथाच्या एका संताने त्याला वरच्या वर झेललं होतं.

बालपणातील या घटनांचा युवराजाच्या मनावर फार खोल परिणाम झाला. आपल्या युवराज होण्यामध्येही देवाचा आणि दैवाचाही फार मोठा वाटा आहे, असं त्याने पुढे मान्यही केलं.

या उन्हाळी सुट्टीनंतर १९३१ च्या सप्टेंबरात पुढील शिक्षणासाठी मोहम्मदची रवानगी स्वित्झर्लंडला करण्यात आली. पहिले काही महिने एका खाजगी शाळेत शिकल्यानंतर १९३२ साली ली रोझी इथल्या बोर्डिंग स्कूलमध्ये त्याचं नाव दाखल करण्यात आलं. या ठिकाणी तो चार वर्ष राहिला. या चार वर्षांमध्ये युवराजाच्या व्यक्तिमत्त्व विकासाला भरपूर वाव मिळाला आणि भावी इराणची आदर्श चित्रंही तो रंगवू लागला.

स्वित्झर्लंडमधल्या या शाळेत मोहम्मदची शारिरीक तंदुरुस्ती चांगलीच वाढली. विविध मैदानी खेळांमध्ये त्याने प्राविण्य दाखवलं. अभ्यासामध्येही इतिहास, भूगोल आणि नैसर्गिक शास्त्रांमध्ये त्याला विशेष रस होता. एका शहेनशहाचा मुलगा म्हणून त्याचे मित्र त्याला मान देत नसत, तर आपल्या गुणांच्या जोरावर मोहम्मद पुढे आला; पण त्याला इतर मुलांबरोबर फारसं मिसळू मात्र दिलं जायचं नाही. कित्येक वेळा तर सगळी मुलं खेळायला किंवा पार्टीला गेलेली असताना हा एकटाच आपल्या खोलीत बसून विविध विषयांवर चिंतन करीत असे. दर आठवड्याला वडिलांकडून येणाऱ्या पत्रांचाही त्यात समावेश असे.



मोठ्या उद्योगधंद्यांचं पित्याप्रमाणेच शहाला देखील फार आकर्षण ! पण त्या यंत्रांच्या दात्यांमधला इराणी कामगार मात्र दोघांनाही दिसला नाही !

याच काळात जर्मनीमध्ये हिटलर उदयाला आला आणि युरोपातील एका नव्या प्रकारच्या नेतृत्वाचं प्रतीक बनला. मोहम्मदला जर्मनीच्या इतिहासात विशेष रस वाटू लागला. आपण स्वतः गादीवर आल्यावर शेतकऱ्यांच्या समस्यांकडे प्रथम लक्ष देण्याचा आणि मालक–शेतमजूर संबंध सुधारण्याचा बेतही त्यानं याच वयात आखला. त्याचप्रमाणे, नौशिरवानच्या काळात जशी एक घंटा राजवाड्यात बांधून ठेवलेली असायची आणि न्याय मागण्यासाठी येणारा कोणीही ती घंटा वाजवायची, तशीच आपल्या राजवटीतही एक तक्रारपेटी ठेवण्याची आणि ती रोज स्वतः उघडून वाचण्याची योजना मोहम्मदनं आखली. याच काळातील जागतिक आर्थिक मंदीनंही त्याला भरपूर विचार करायला लावलं. थोडक्यात, कोणतीही एकच एक कल्पना किंवा योजना या सबंध काळात मोहम्मदवर हुकमत गाजवत नव्हती; पण बदलत्या परिस्थितीमुळे मात्र त्याला विचार करण्याची नवीन पद्धती गवसली. कारण पित्याबद्दल पूर्ण आदर ठेवूनही मोहम्मदनं हे ओळखलं होतं की, त्याच्यापुढील समस्या आणि भावी काळातील आपल्या समस्या अत्यंत निराळ्या असणार आहेत.

१९३३ साली मोहम्मद जेव्हा स्वित्झर्लंडहून परत आला तेव्हा तो पूर्णपणे बदललेला होता. त्यानंतर तेहरानमधील मिलिटरी कॉलेजमध्ये फ्रेंच अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहम्मदचं प्रशिक्षण सुरू झालं. याच काळात इराणमधील वेगानं बदलणाऱ्या परि-

स्थितीची त्याला कल्पना येऊ लागली. पुरोगामी विचारांच्या रेझा शहानं इराणमध्ये अनेक नवनवीन योजना चालू केल्या होत्या. अँग्लो–पर्शियन ऑईल कंपनीबरोबरचा जुना करार मोडून नवा करार करण्यात आला. देशामध्ये औद्योगिक वाढही प्रचंड प्रमाणात होऊ लागली होती; पण यामध्ये इराणी माणसाच्या मनाचा आणि मताचा फारसा विचारच केला जात नव्हता. हीच चूक पुढे मुलगाही करणार होता.

१९३९ साल उजाडलं आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळ्या सावल्या सबंध जगावर पसरू लागल्या. या प्रचंड संहारात आपण तटस्थच राहायचं, असं या पिता-पुत्रांनी ठरवलं होतं; पण रोज नवीन वळणं घेणाऱ्या या महायुद्धानं ब्रिटन आणि रशिया या दोन विरोधी शक्तींना एकत्र यायला लावलं. त्यांच्या मैत्रीचा मार्ग इराणमधूनच जात होता. त्यामुळं साहजिकच या दोन्ही शक्तींनी इराणवर हल्ला चढवला. शहाच्या सैन्यानं प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना माघार घ्यावी लागली. इराणला अपमानास्पद शस्त्रसंधी करावा लागला!

१६ सप्टेंबर १९४१ रोजी रेझा शहानं आपल्या युवराजाला बोलावून घेतलं आणि राज्यपदाची जबाबदारी त्याच्यावर टाकली. २७ सप्टेंबर रोजी रेझा शहा आपल्या कुटुंबियांसमवेत देश सोडून चालतादेखील झाला. अर्थात या खांदेपालटाची सूत्रं ब्रिटनच हालवत होता. त्याचा भारतामध्ये येऊन मुंबईला राहण्याचा विचार होता; पण त्या वेळच्या भारतातील अँग्लो-इंडियन सरकारनं, शहा भारतात आला तर दंगलीचा डोंब उसळेल, असे सांगून मुंबईपासून सहा मैलांवर समुद्रातच रेझा शहाला दुसऱ्या बोटीत चढवण्यात आलं आणि बोट मॉरिशसच्या बेटाकडे निघाली.

रेझा शहा काही काळ पोर्ट लुईस या मॉरिशसच्या राजधानीत राहिला; पण तिथलं हवामान न मानवल्यामुळं त्यानं आपला मुक्काम दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथे हालवला. या सबंध काळातही तो आपल्या इराणमधील राज्यकर्त्या मुलाशी सतत संपर्क ठेवून होता. याच ठिकाणी १९४४ च्या जुलैमध्ये रेझा शहाचा मृत्यू झाला. या वेळी इराणमध्ये त्याचा तीनच वर्षांपूर्वी गादीवर आलेला मुलगा–गेल्या आठवड्यात देश सोडून गेलेला शहा–अवघा पंचवीस वर्षांचा होता आणि विविध संकटांच्या मालिकेलाच तो तोंड देत होता. ब्रिटन आणि रशिया एका बाजूनं इराणवर अपमानास्पद अटी लावून त्याचे लचके तोडत होते आणि दुसऱ्या बाजूने मोस्ताफा फतेह या अँग्लो–इराणियन ऑईल कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला प्रोत्साहन देऊन तुदेह पक्ष या देशांतर्गत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करायला लावून देश आतून पोखरत होता.

दुसऱ्या महायुद्धाचा निकाल दृष्टिपथात येऊ लागल्यावर ब्रिटन, रशिया आणि अमेरिका या तीन बड्या शक्तींमध्ये सत्तेचं राजकारण खेळलं जाऊ लागलं. यामध्ये इराणला असलेला संभाव्य धोका लक्षात घेऊन शहानं स्टॅलिन, रूझवेल्ट आणि चर्चिल या तिघाही बड्या शक्तींच्या नेत्यांना शिखरपरिषदेसाठी निमंत्रित केलं. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर १९४३ या काळात तेहरानमध्ये ही परिषद झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणातील शहाचं हे पहिलंच महत्त्वाचं पाऊल होतं; पण त्यानं ही परिषद यशस्वी केली. म्हणूनच हे तिन्ही नेते तेहरान सोडताना म्हणाले, 'आम्ही मोठ्या आशेनं आणि निश्चयाने या ठिकाणी आलो आणि आता खऱ्याखुऱ्या मैत्रीचं नवं पर्व निर्माण करून इराणचा निरोप घेत आहोत.'

अर्थात ही शिखर-परिषद झाल्यावर आणि त्यातील मैत्रीच्या करारावर सह्या केल्यानंतरही स्टॅलिनने इराणच्या उत्तर भागातील रशियन फौजा काढून घेण्यात खळखळ केलीच; पण हॅरी ट्रुमन या नव्या अमेरिकन अध्यक्षाच्या मदतीने शहाने स्टॅलिनला नमवले.

शहाची इराणमधील लोकप्रियता वाढत होती; पण त्याचबरोबर त्याला अनेक शत्रूही निर्माण होत होते. यांपैकीच एकाने ४ फेब्रुवारी १९४९ रोजी तेहरान विद्यापीठाच्या वार्षिक समारंभासाठी शहा आला असताना त्याला गोळ्या घालून ठार मारण्याचा प्रयत्न केला; गंभीर स्वरूपाच्या जखमांवरच हे संकट निभावलं. तशा जखमी अवस्थेतही कार्यक्रम चालू करण्याचा आग्रह शहानं धरला; पण त्याच्या पाठीराख्यांनी त्याचं न ऐकता शहाला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. पुन्हा एकदा शहाचा देवा-धर्मावरचा विश्वास दृढ झाला. ◻

७ ऑगस्ट १९४९ रोजी पंधरावी 'मजलिस' विसर्जित झाली; पण त्याच वेळी एक नवीन समस्या शहासमोर उभी होती. इराणमध्ये जी ऑइल कंपनी होती तिला तेल-उद्योगात प्रचंड नफा होत असे; पण या नफ्यातून सरकारच्या एकूण करांच्या अवघा १५ टक्के कर ही कंपनी इराणच्या सरकारला देत असे आणि उरलेला सर्व पैसा देशाबाहेरील इतर भागांमध्ये कंपनीचं जाळं पसरवण्यासाठी वापरला जात असे. कंपनीचं हे वर्तन शहाला मान्य नव्हतं, तसंच सामान्य इराणी जनताही ऑइल कंपनीच्या या पॉलिसीवर खवळली होती. कारण कंपनीच्या नफ्यातील फार मोठा भाग ब्रिटनकडे जात असे. शहानं वाटाघाटीचे अनेक मसुदे कंपनीपुढे ठेवले; पण कंपनीनं त्यांपैकी कोणत्याच मसुद्याला दाद दिली नाही. याच प्रश्नावर १९४६ ते १९५१ या काळात सात सरकारे खाली खेचली गेली. याच वेळी मोहम्मद मोझादेक हा नॅशनल फ्रंट या पक्षाचा नेताही या ऑइल कंपनीचं राष्ट्रीयीकरण करण्याचा आग्रह धरत होता. 'हे राष्ट्रीयीकरण जर झालं तर इराणमध्ये समृद्धीचं नवं युग सुरू होईल,' असं मोझादेक सामान्य जनतेला ओरडून सांगत होता. शहानं याच संधीचा फायदा घ्यायचं ठरवलं आणि मोझादेकला इराणचं पंतप्रधानपद त्यानं बहाल केलं आणि २६ सप्टेंबर १९४९ रोजी या ऑइल कंपनीचं राष्ट्रीयीकरण झालं. ब्रिटननं या प्रश्नावर अगदी आंतरराष्ट्रीय न्यायालयापर्यंत धाव घेतली. सुरक्षा समितीपुढे आपलं गाऱ्हाणं मांडलं; पण त्याला शेवटी माघारच घ्यावी लागली. शहा आणि मोझादेक, दोघांच्याही दृष्टीनं, हा एक महत्त्वपूर्ण विजय होता. ◻

परंतु मोझादेकच्या डोक्यामध्ये यामुळे निराळंच वारं भरलं. शहा त्याला वारंवार संधी देत होता आणि मोझादेक त्याचा फायदा घेत होता. त्यानं शहाची भेट घेऊन आणीबाणीच्या काळात वापरता येणारे सर्व अधिकार मिळावेत, त्यावर मजलिसचं बंधन राहू नये आणि देशाच्या लष्कराचाही ताबा आपल्याला मिळावा, अशी मागणी केली. साहजिकच शहानं त्याच्या या मागण्या

पृष्ठ २५ वर

# दोन कविता

अनुवाद : सतीश कामत

शत्रूने केलेल्या वारामुळे
तुझ्या छातीत खोल जखम झाली आहे.
पण,
तरीदेखील तू तसाच ताठ उभा आहेस,
कारण शरणागती न पत्करणं
हाच तुझा स्वभाव आहे.

पर्वतशिखरावरील पाईन वृक्षाप्रमाणे
तू अविचल आहेस.
तुझ्या धमन्यांतील रक्तात सुद्धा
संगीत आहे,
विजयाचं संगीत देखील तुझ्यातच आहे,
तुझे विशाल नेत्र आजच्याइतके लाल
कधीच नव्हते.

तुझं रक्त चौक न् चौक
जिवंत करून सोडील.
शहराच्या त्या भागातील माणसं
इकडल्या भागात धावत येतील,
आणि असेल तो भाकर-तुकडा
वाटून घेतील.
आणि एकमेकांची भूक देखील !

शत्रूने उंचच उंच भिंती
उभारल्या आहेत,
या चिंध्या पांघरून चाललेल्या
क्षुद्र जिवांना तू क्षमा कर,
आज त्यांना तुझं नावदेखील माहीत नाही,
पण ज्या दिवशी ते तुला ओळखतील,
तेव्हा तुझ्या रक्ताचा थेंब न् थेंब
त्यांना प्यारा झाला असेल !

प्रत्येक राष्ट्रगीतात
तुझंच नाव ते गातील !
तुझं नाव हेच इराणचं
प्रतीक आहे,
तुझ्या केवळ नावामुळे
कास्पियनमुद्धा
जिवंत होऊन उठेल.

—खोस्रो गोल्सोरखी

इराण, माझी भूमी !
इथला समुद्रदेखील आज लाल झाला आहे,
इथल्या उत्तुंग पर्वतांवर.
आज उन्मत्त कुत्री चढाई करू पाहतायत्.

इराण, माझी भूमी !
पण आज या संपन्न मातीमध्ये
किळसवाणी खेचरं नांगर फिरवून,
ही माती रक्ताळून टाकत आहेत.
या भूमीच्या पोटातील
निर्मळ पाणी
इथल्या साम्राज्यवाद्यांनी पिऊन टाकलं आहे.

पण हे माझ्या भूमी इराण !
मी आजच शपथ घेते.
तुझ्या शांत रात्रींना
गोळ्यांच्या वर्षावाने उत्तर देण्याची;
तुझ्या अंधकारमय रात्री
गोळ्यांच्या प्रखर ज्वालांनी उजळून टाकण्याची;
आणि तुझ्या गोठलेल्या रात्रीमधील थंडपणा
गोळ्यांच्याच उष्णतेने वितळवून टाकण्याची !!

—आश्रफ देहगानी

# किं करोमि? क्व गच्छामि ?
# इराण-आत्मसंदेहाचा बळी

चन्द्रशेखर पुरन्दरे

## भूतस्य कथा रम्या !

इसवीसनापूर्वी ४००० वर्षांपासून इराणची संस्कृती अस्तित्वात आहे. इराणी मनाची ठेवण आज विशिष्ट होण्याचं एक प्रमुख कारण ह्या प्रागैतिहासिक संस्कृतीचा असणारा अभिमान हे आहे. अश्मयुगातही आजच्या कॅस्पियन समुद्राच्या दक्षिणेला आणि इराणच्या पठारी भागात मनुष्य अस्तित्वात होता. इसवी सनापूर्वी २००० च्या सुमारास आर्यांचा प्रवेश इराणमध्ये झाला. ( इराण हे नाव 'आर्यन'पासून तेव्हाच रूढ झाले ) दक्षिणमध्य रशियापर्यंत आलेल्या आर्यांमधील काही भारतात तर काही इराणमध्ये गेले. त्यांच्यातही मीड्स् ( Medes ) आणि पर्शियन्स असे दोन प्रमुख गट होते. मेसोपोटेमियापासून कॅस्पिअनपर्यंत यांनी वसती केली. मीड्स् हे राज्यकर्ते झाले आणि पर्शियन अनेक टोळयांपैकी एक प्रजानन म्हणून राहिले.


### सायरसचे पुत्र

सुमारे दीड हजार वर्षांनंतर सायरस ह्या पर्शियनाने मीडियन साम्राज्य उलथून टाकले. तो सम्राट झाला आणि पुढे 'सायरस द ग्रेट' झाला. याच्याच काळात राष्ट्र म्हणून इराण खऱ्या अर्थाने जन्माला आला. विस्कळित टोळयांना एकत्र आणून भूमध्य समुद्रापासून पंजाबपर्यंत आणि नाइलपासून तुर्कस्तानपर्यंत प्रचंड साम्राज्य त्याने उभे केले. इसवीसनपूर्व ५५० ते ३३१ पर्यंत त्याच्या वंशजांचे राज्य टिकले. सायरस हा आखेमेनिद या नावाने ओळखल्या जाणाऱ्या टोळीतला होता; म्हणून या काळालाही आखेमेनिद काळ म्हणतात. हे इराणचे पहिले सुवर्णयुग होते. प्रत्येक इराणी या काळाकडे 'ते हि नो दिवसा गताः' अशा सखेद भावनेने पहातो.

या काळात झोरॅस्टरचा झोरॅस्टरॅनिझम जनसामान्यांचा धर्म झाला; परंतु इराणी साम्राज्य वाढले तरी क्रौर्य किंवा दुष्टपणा पराभूतांच्या वाटयाला आला नाही. सुसंस्कृतपणे ( जेवढा विजेत्याकडून अपेक्षिता येईल तेवढा ) व समंजसपणे ज्यूंना, इजिप्शियनांना त्यांचे स्वतःचे धर्म पाळायला मुभा देण्यात आली होती. जिंकलेल्या प्रदेशात जमीन सुपीक करण्यासाठी तत्काळ प्रयत्न सुरू करण्यात येत. त्यामुळेच १९५३–५४ मध्ये डॉ. मुहम्मद मुसादेकने जेव्हा 'सायरसच्या पुत्रांनो' या नावाने परकीयांविरुद्ध संघटित होऊन त्याला पाठिंबा देण्याची हाक दिली, तेव्हा संपूर्ण इराण त्याच्या पाठीशी उभा राहिला.

हे सुवर्णयुग नंतर कालौघात लयाला गेले. अलेक्झांडरने इ. पू. ३३१ मध्ये इराण पादाक्रांत केला आणि सर्व सुंदर शिल्पांचा नायनाट केला. पश्चिमेबद्दलच्या आकसाने याच काळात मूळ धरले आणि पश्चिमेनेही नंतरच्या काळात, अगदी आजतागायत या आकसाला खत-पाणी घातले. ग्रीक लोक अलेक्झांडर पाठोपाठ आले आणि वर्णसंकर मोठ्या प्रमाणात झाले. इसवीसनापूर्वीच्या पहिल्या शतकात ग्रीकांना पर्शियन या एका आर्य टोळीने परत धक्का मारला आणि सुमारे चारशे वर्षे पर्शियन राज्यारूढ झाले. त्यानंतरचे ससनियन घराण्याचे राज्य हे अरब आक्रमणाआधीचे शेवटचे अस्सल इराणी साम्राज्य.

आजचा इराणी ससनियन काळाला आदर्श मानतो. या काळी राजा व प्रजा मित्रत्वाने नांदत, समाजाचा सगळयात खालचा शेतकरीसुद्धा शहाशी निर्भयतेने बोले, असा नंतरच्या काव्यामध्ये उल्लेख आहे. विसाव्या शतकातील तूदेह पक्षानेसुद्धा ( हा कम्युनिस्ट पक्ष होता ) या कालाकडेच 'समानतेचे युग' म्हणून बोट दाखविले. संस्कृतीची भरभराट होऊन 'पहलवी' या नावाने त्या काळची भाषा आणि लिखाण नंतर ओळखले गेले. इराणच्या सध्याच्या शहाच्या बापाने हेच नाव आपल्या राजवटीसाठी निवडले. ससनियन घराणे तुर्कांशी आणि ग्रीकांशी लढून इसवीसनाच्या सातव्या शतकात लयाला गेले. दुबळया झालेल्या ठिकठिकाणच्या राज्यांना पराभूत करणे




सातव्या शतकातल्या झंझावाती इस्लामला जड गेले नाही.

**मुस्लिम राजवट –** मुहम्मद पैगंबराच्या मृत्यूनंतर उमयाद आणि हशेमित हे दोन पंथ निर्माण झाले. त्यातले हशेमित पंथीय पुढे 'शिया' या नावाने प्रसिद्धीस आले. पैगंबराचा जावई अली याच्यावर त्यांची श्रद्धा. प्रथम उमयाद राज्यकर्ते होते; पण आठव्या शतकात शियांनी राज्य बळकावले आणि परत एकदा पर्शियाला महत्त्व प्राप्त झाले. दहाव्या शतकापर्यंत समनिद आणि बुवईद ही पर्शियन शिया घराणी राज्य करीत होती. याच सुमारास रुदगी आणि दकीकी हे पहिले महाकवी होऊन गेले. फिर्दौसी हा 'शाहनाम्या'चा कर्ता त्याच्या नंतरचा. दहाव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत परत एकदा पर्शिया उद्ध्वस्त झाला. तुर्क आणि मंगोलांनी प्रचंड विध्वंस या कालात केला. चेंगीझखानने तर सगळ्या कला, समृद्धीची राखरांगोळी केली आणि नंतर तैमूरलंगाने उरलेसुरले काम उरकले.

पंधराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत इराण पुन्हा प्रगती करू लागला आणि तेव्हाच स्वतःचा देश सोडून इतरांना नंगे करायला निघालेले कुटिल ब्रिटिश रंगमंचावर प्रविष्ट झाले. ◻

## वर्तमान पेचाची जडणघडण

अठराव्या शतकात ब्रिटनची आणि रशियाची इराणची बाजारपेठ बळकावण्यासाठी चढाओढ चालू होती. त्यामुळेच इराण कोणत्याही एका सत्तेच्या आधिक्याखाली गेला नाही. मास-कॉन्शसनेसही याच काळात वाढू लागला. शहावर जनमताचे दडपण येण्याचा पहिला प्रसंग १८०० मध्ये घडला. तेव्हा ब्रिटनला तंबाखूच्या व्यापाराचा एकाधिकार त्या वेळच्या शहाने मंजूर केला; पण नंतर जनविरोधापुढे मान तुकवून रद्द केला.

१९०६ मध्ये सुमारे ५० वर्षांच्या परकीय शोषणाविरुद्ध प्रचंड असंतोषाची लाट उसळली. सगळीकडे निदर्शने आणि सत्याग्रह सुरू झाले. तेव्हाच राज्यघटना निर्माण करून पहिले पार्लमेंट (मजलिस) स्थापण्यात आले. मात्र हे दोनच वर्षे टिकले. १९०८ ला शहाने ते रद्द केले आणि लष्कराचा आधार घेतला. १९०९ ला शहाला पद-

च्युत करून त्याच्या बारा वर्षांच्या मुलाला राज्याभिषेक झाला. या दरम्यान रशिया आणि ब्रिटनने इराण निम्मा निम्मा घशात घातलाच होता. पहिल्या महायुद्धापर्यंत उत्तर इराण रशियाचा आणि दक्षिण इराण ब्रिटनचा अशी परिस्थिती होती. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तान अन् जर्मनीचा शिरकाव इराणमध्ये झाला. जर्मनीने दक्षिण इराण ब्रिटनच्या घशातून आपल्या घशात ढकलण्याचा बराच प्रयत्न केला. तेव्हा एक अँग्लो रशियन कमिशन स्थापून पर्शियन सैन्याचे व अर्थव्यवस्थेचे रक्षण करण्याचा प्रयत्न झाला.

१९१९ मध्ये ब्रिटनने संपूर्ण इराण उघड उघड मिळवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शहाने आणि मंत्रिमंडळाने पाठिंबाही दर्शवला; पण मजलिसने हा देश विकण्याचा उद्देश उधळला. यामुळे ब्रिटिशांबद्दल सर्वत्र चीड मात्र निर्माण झाली.

## पहलवी घराणे

पर्शियन कोझॅक ब्रिगेडमधला एक अधिकारी कमांडर झाला आणि त्याने १९२१ मध्ये अकर्तृत्ववान शहा, भ्रष्टाचारी कॅबिनेट आणि दुबळी यंत्रणा यांना डच्चू दिला. रेझा खान हे त्याचे मूळ नाव. त्याने १९२६ मध्ये सिंहासनारोहण केले. त्याने पहलवी घराणे स्थापले. हा आत्ता सोळा जानेवारीला पळालेल्या शहाचा बाप.

याच्या काळातच आधुनिकीकरणाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. पश्चिमेच्या धर्तीवर आधुनिकीकरण केले की, इराण खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल या समजुतीने त्याने रेल्वे सुरू केल्या, नवे रस्ते बांधले, कारखाने, शाळा उभारल्या आणि अनेक सामाजिक व आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी निष्ठुरपणे सुरू केली. याचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे न्यायदानाचा अधिकार मुल्लांना होता तो नागरी कोर्टांना देण्यात आला. एक वरवरची सांस्कृतिक क्रांती झाल्यासारखे वाटले; पण एक मूलतः चूक जी झाली ती कधी सुधारली गेलीच नाही. हीच चूक त्याच्या मुलाने केली आणि डोळ्यांदेखत आपले साम्राज्य उद्ध्वस्त होताना पाहणे त्याच्या नशिबी आले.

**कोणत्याही देशाची स्वतःची एक गती असते, स्वतःचा एक स्वभाव असतो, एक व्यक्तिमत्त्व असते. खरा नेता हा खऱ्या अर्थाने भूमिपुत्र असावा लागतो. त्या लोकांच्या अपेक्षा, आकांक्षा या इतिहासाचे भान ठेवून आपल्या स्वतःच्या दूरदृष्टीने देशाला पुढे नेतील अशा पद्धतीने फलद्रूप करणे ही त्याची कसोटी असते. देशाची नाडी त्याला कळावी लागते. हे दोन्हीही शहांना जमले नाही. कोणत्याही गोष्टीची नक्कल, मग ती पाश्चात्य रहाणीची असो अगर मार्क्सवादाची असो, ती अस्सल गरज पुरवू शकत नाही. आजच्या शहा-विरोधकांना काही काळ चाचपडणे यामुळेच अपरिहार्य ठरणार आहे.**

परत दुसऱ्या महायुद्धाच्या काळाकडे वळू. तेव्हा (१९४१ मध्ये) रशिया आणि ब्रिटनने इराणी सरकारला इराणमधील कित्येक हजार 'अ‍ॅक्सिस' देशीयांचे नागरिकत्व काढून घ्यावे अशी सूचना केली. रेझा शहाने ती फेटाळली आणि दक्षिण, उत्तर आणि वायव्येकडून इराणवर चढाई करण्यात आली. ऐशी तासांची लढाई झाली आणि अर्थातच इराणचा पराभव झाला.

दुसऱ्या महायुद्धाच्या या काळातच रेझा शाह हा हिटलरच्या बाजूने झुकतो आहे, असे दिसल्याबरोबर इराणवर त्या वेळी चांगलीच हुकमत असणाऱ्या ब्रिटनने त्याला पदच्युत केले. त्याचा वीस वर्षांचा मुलगा, म्हणजे सध्याचा शहा गादीवर आला. तो त्या वेळी लोकशाहीच्या गप्पा मारीत असे आणि वेळप्रसंगी बापाच्या हुकूमशाहीवरही टीका करीत असे.

त्या वेळी जगच एका संधिकालातून जात होते. जमीनदारांनी भरडलेल्या नि उमरावांच्या युगात मन अडकलेल्या इराणी समाजालाही नव्या मनूची स्पंदने जाणवत होती. त्याचाच एक परिणाम म्हणून तुदेह पार्टी स्थापन झाली. फॅसिझमविरोधी असणारा हा पक्ष त्या काळी स्वतःला कम्युनिस्ट समजे आणि कामगारांसाठी झटण्याचा निश्चय बोलून दाखवी. दुसरी जेब-इ-मेली हा राष्ट्रवाद्यांचा पक्ष होता. दोन्ही पक्षांना लोकांचा बऱ्यापैकी पाठिंबा होता आणि मुळात शहा त्या वेळी अस्थिर होता. तुदेह पक्ष तर शहाचे अस्तित्वच मानायला तयार नव्हता. जेब-इ-मेली (नॅशनल फ्रंट) हा पक्ष त्या मानाने इंग्लंडच्या राणीसारखा शहाला शोभेचा पुतळा करण्याइतकी तरी तयारी दाखवत होता. १९४१ ते १९५१ ह्या काळात शहाला काहीच ताकद वापरता येत नव्हती. अँग्लो इराणियन ऑइल कंपनी (AIOC) ही शांतपणे इराण शोषणारी ब्रिटिश कंपनी होती. त्या वेळी मुसादेक हा इराणचा पंतप्रधान होता. तोपर्यंत इराण प्रामुख्याने पाश्चात्यांचीच वसाहत असल्याने त्याला ती परिस्थिती नष्ट करायची होती. म्हणून त्याने या ऑइल कंपनीचे राष्ट्रीयीकरण केले. त्यामुळे अर्थातच ब्रिटन खवळले आणि सूड म्हणून इराणी तेलाचा आंतरराष्ट्रीय बाजारातला व्यापारच बंद पाडण्यात आला. परिणामतः आर्थिक व्यवस्था कोसळली. एक-दोन महिने नव्हे तर तब्बल तीन वर्षे ही नाकेबंदी चालू राहिली. मुसादेक जुमानेना.

नेमक्या याच वेळी शहाने आतून ब्रिटन आणि अमेरिकेशी संधान साधले. इराणी तेलाचे राष्ट्रीयीकरण रद्द करण्याचे आश्वासन देऊन CIA च्या साथीने मुसादेकचे सरकार उलथण्यात आले. मुसादेकला लोकांचाच पाठिंबा होता. १९५३ च्या ऑगस्टमध्ये हे लष्करी अधिकाऱ्यांचे बंड झाले आणि मुसादेक कैदेत पडला. त्याआधी

---

## दर्युषचे वंशज

दर्युष (५२१ ते ४८५ इ. पू.) हा दुसरा मोठा राजा आखेमेनिद घराण्यातच होऊन गेला. आपण पर्शियन असल्याचा, आर्य असल्याचा त्याला अभिमान होता. त्याच्या पर्सेपोलिस या राजधानीत प्रचंड प्रासादावरच्या खालील शिलालेखावरून त्याची दर्पोक्ती लक्षात यावी.

'मी राजांचा राजा. सर्व वंशांच्या लोकांच्या राज्यांचा अधिपती. समुद्रवलयांकित पृथ्वीच्याही पलीकडे माझे साम्राज्य पसरलेले आहे. मी हिस्तेपसचा पुत्र, एका पर्शियनाचा पुत्र, आर्यवंशाचा एक महान आर्य !' □

आठवडाभरच लोकांचा असंतोष आणि शहाविरुद्धची चीड या टोकापर्यंत पोचली होती की, जीव वाचवायला शहा देशाबाहेर पळून गेला. तो गेल्यानंतर लगेचच बंड झाले न् शहा जो परतला तो आणखी सव्वीस वर्षांनीच १६ जानेवारीला परत पळेपर्यंत.

मधली पंचवीस वर्षे शहाचा एकतंत्री कारभार चालू होता. सत्तेच्या मोबदल्यात देश विकायला त्याने तेव्हाच सुरुवात केली. किंबहुना देशाच्याच मोबदल्यात त्याने सत्ता घेतली होती आणि ती टिकवण्यासाठी उत्तरोत्तर पाश्चात्यांचा शिरकाव तिथे करून घेतला.

सर्वप्रथम अर्थातच कम्युनिस्ट पार्टीवर व नॅशनल फ्रंटवर गदा आली. त्या दरम्यान हजारो माणसं मारली गेली. मूठभर उमराव आणि पोसलेले लष्कर यांच्या साथीने मयूरसिंहासन भक्कम करण्यात आलं. वेळोवेळी राजकीय विरोधकांच्या रक्त-मांसाचं खतपाणी घालून ते स्थिर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी SAVAK सारखी गुप्त पोलिस यंत्रणा राबवण्यात आली. राजकीय विरोधक टिपून नष्ट करणे हे या SAVAK चे प्रमुख काम. कम्युनिस्ट आणि नॅशनल फ्रंट या पक्षांवर बंदी असली तरी त्यांचे काम आतून चालू होतेच. लष्कराच्या आणि ग्रामीण भागातील जमीनदारांच्या मदतीने शहा सिंहासनावर फिट्ट बसला.

१९६२ पर्यंतचा काळ हा आपले आसन बळकट करण्यात शहाने घालवला. १९६२ ला केनेडी अमेरिकेचा अध्यक्ष होता. ७० टक्के जमीन १९६२ पर्यंत मोठ्या जमीनदारांच्या ताब्यात होती. त्यामुळे ग्रामीण भाग अस्वस्थ होता. शेतकरी आणि शेतमजूर असंतुष्ट होते. ग्रामीण भागातील तणाव कमी करण्यासाठी केनेडीच्या सल्ल्यानुसार जमिनीचे पुनर्वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. हे वाटप कागदोपत्री झाले. लोकांचा सहभाग त्यात फारसा काय, अजिबातच नव्हता.

ही इराणची सुप्रसिद्ध श्वेतक्रांती.

श्वेतक्रांतीने काहीच घडले नाही असे अजिबात नाही. मुळात उद्दिष्ट वरच्या वर्गाचे हितसंबंध जपण्याचे असल्याने ती लोकांची चळवळ झाली नाही. मजलिसच्या निवडणुकांवर तोपर्यंत पूर्णत: धनाढ्यांचे वर्चस्व असे (महाराष्ट्रातल्या साखर कारखान्यांप्रमाणे). त्यांचे पित्ते मजलिसमध्ये निवडून जात आणि त्यांना धक्का लागू देत नसत. श्वेतक्रांतीमुळे कारखानदार आणि नोकरशहा ही नवी सत्ता-केंद्रे झाली.

मतदानाला स्त्रिया पात्र झाल्या आणि बुरख्याच्या बाहेर आल्या. त्यांना उमेदवारीचाही अधिकार मिळाला. १९६३ च्या सप्टेंबर महिन्यातल्या सार्वत्रिक निवडणुकांत नवनिर्वाचित मजलिसमध्ये मोठ्या प्रमाणात स्त्रिया होत्या. त्यामुळे धर्मांध मुस्लिम खवळले. रेझा शहापासून पद्धतशीरपणे धर्माचे महत्त्व कमी करण्यात येत होतेच. त्यामुळे हेही लोक असंतुष्ट झाले आणि परिणामत: १९६३ च्या जूनमध्ये तेहरान, मशद, ताब्रिझ आणि शिराझमध्ये प्रचंड प्रमाणात निदर्शने झाली. सध्या चालू असणाऱ्या विरोधाइतकाच तेव्हाही भडका उडाला. शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या बळींची संख्या दहा हजारांच्या घरात गेली. हा पहिला प्रचंड विरोध पूर्ण ताकदीनिशी दडपण्यात आला. SAVAK ने या वेळी महत्त्वाची भूमिका बजावली आणि दमनसत्र उत्साहाने पार पाडले.

**आयेतोल्ला खोमेनी**

याच वेळी आयेतोल्ला खोमेनी या धर्मगुरूला तुर्कस्तानमध्ये हद्दपार करण्यात आले. हा आज ७८ वर्षांचा असणारा धर्मगुरु तुर्कस्तानमधून इराकला गेला. इराक-इराण संबंध प्रेमाचे नव्हतेच. बगदादच्या एका धर्मविषयक संस्थेचा तो प्रमुख झाला. तिथून तो फ्रान्सला गेला आणि १९६२ पासून सतत शहाच्या पाडावाची मागणी करत राहिलेला आहे. आज तो विरोधकांचा नेता झालेला आहे. परवापर्यंत आपली सत्ता गाजवण्याची इच्छा नाही, असे तो म्हणत होता; पण आता त्याचा विचार बदलला असल्याचे दिसते. ते पुढे सविस्तर पाहू.

**इस्लामिक मार्क्सिस्ट**

१९६३ चा विरोध दडपल्यामुळे परत एकदा धर्मनिष्ठांच्या भूमिगत कारवाया सुरू झाल्या. याच सुमारास तूदेह या कम्युनिस्ट पक्षाच्या काही माजी सभासदांनी एकत्र येऊन एक कम्युनिस्ट गट स्थापला. आपल्याकडच्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडून जशी नक्षलवाद्यांची संघटना उभारली गेली तसा हा प्रकार झाला. संसदीय लोकशाहीला वाव देऊन पाहू, ही CPM ची भूमिका जशी नक्षलवाद्यांना नामंजूर होती तसेच तूदेह पक्षाच्या बाबतीत झाले. ह्या गटाच्या मते सशस्त्र उठावाखेरीज इराणपुढे पर्यायच राहिलेला नव्हता. १९६७ ला सावकचा वरवंटा त्यांच्यावरून व्यवस्थित फिरला आणि भूमिगत झाले ते बचावले. त्यांनी सझेमाने शिरिकाए-फदायी-खल्क या नावाची एक गुरिला संघटना स्थापली. १९६६ ला धर्मनिष्ठांनी नहजत ए अझदी ए इराण ह्या आधीच्या संघटनेतील उरल्यासुरल्यांना बरोबर घेऊन सझेमाने मोजाहेदिनी ए खल्क इराण ही दुसरी संघटना स्थापली. या संघटनांचा एकमेकांशी संबंध होता. धार्मिक, राजकीय आर्थिक आणि सामाजिक असे एक मिश्र स्वरूप त्यामुळे या संघटनेला मिळाले आणि आजचे जरा गोंधळात टाकणारे 'इस्लामिक मार्क्सिस्ट' हे नाव शहाच्या सरसकट विरोधकांना प्राप्त झाले.

१९६९ मध्ये एक मार्क्सिस्ट लेनिनिस्ट आणि एक मार्क्सिस्ट टॉट्स्किस्ट अशा दोन संघटना नव्याने जन्माला आल्या आणि सावकने लवकरच त्यांना नष्ट केले.

---

## लक्ष भारतावर....

इराणच्या इतिहासात एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते. सगळ्या पश्चिमी शक्तींना इराण हा भारताला जायचा मार्ग म्हणून जिंकायचा होता. पीटर द ग्रेटपासून नेपोलियनपर्यंत सर्वांना इराणचे महत्त्व याच दृष्टीने वाटत होते. १९२० मध्ये रशियनांनाही हेच महत्त्व जाणवले व त्यासाठी प्रत्येकाने इराण बळकावण्याचे स्वभावधर्मानुसार मार्ग वापरले. फ्रान्सने वाटाघाटी केल्या. जर्मनीने आत शिरकाव केला आणि ब्रिटनने मुत्सद्दीपणे आर्थिक शोषण केले. □

फेब्रुवारी १९७१ मध्ये सझेमाने शिरिका ए फेदायी ए खल्क या संघटनेने उत्तर इराणमध्ये एका जंगलात सिआकल या ठाण्यावर हल्ला केला व शस्त्रास्त्रे पळवली. ताबडतोब लष्कर तिकडे मोठ्या प्रमाणावर गेले आणि जंगलाचा प्रचंड भाग जाळण्यात आला. पंधरा गुरीलांना अटक झाली आणि ताबडतोब ठार मारण्यात आले; परंतु या घटनेचे पडसाद सर्वत्र उमटले. शहाविरुद्ध या परिस्थितीतही काही करता येते हे लोकांना कळले, नीट कळले. जवळजवळ एक हजाराहून जास्त स्वतंत्र राजकीय गट या घटनेच्या निषेधार्थ स्थापन झाले; पण ते ' सावक 'खाली तसेच विरघळले सुद्धा ! ◻

## पेट्रोल–पेट्रोल–पेट्रोल–

या सार्‍या अन्तर्गत घडामोडींमुळेही इराणी सत्ता न हलण्याचे प्रमुख कारण पेट्रोल होते १९६९ पासून इराण तेल उत्पादक राष्ट्रात तिसर्‍या क्रमांकावर होता. १ ज़ानेवारी १९७४ पासून पेट्रोलच्या किमती चौपट करण्यात आल्या. इराण तेव्हा दुसर्‍या क्रमांकाचा तेल निर्यात करणारा देश होता. ३२ कोटी टन तेल १९७४ मध्ये निर्माण झाले आणि त्यामुळे इराणला वीस अब्ज डॉलर्स मिळाले. १९७० मध्ये एक अब्ज डॉलर्स मिळाले होते. यावरून प्रचंड कमाईची कल्पना येईल.

प्रमुख नऊ बँकांमध्ये हा पैसा साठवला जातो. Finace Capital प्रचंड असल्याने इराणियन बूर्ज्वाझी इराणमध्येच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पटावरही सूत्रे हलवतो.

प्रमुख तीन प्रकारे या पैशाचा विनियोग होतो.

**१) परदेशी :** परदेशी मदत किंवा उद्योगात शेअर्स या रूपाने हा पैसा गुंतला आहे. साधारण साडेतीन अब्ज डॉलर्स वेस्ट जर्मनीच्या स्टील कंपनीत शेअर्स, वर्ल्ड बँकेला कर्ज, अमेरिकेच्या गुर्मन कॉर्पला कर्ज, ब्रिटिश कंपन्यांना कर्ज, फ्रान्सला पाच अॅटॉमिक रिअॅक्टर्सच्या खरेदीची किंमत म्हणून आणि भारत, पाकिस्तान, बांगला देशाला मदत म्हणून १९७४ साली दिले गेले होते.

**२) लष्कर :** प्रामुख्याने ह्याचा उपयोग इराणी सैन्यासाठी शस्त्रास्त्रे विकत घेण्यासाठीच होतो. ६० टक्क्यांहून अधिक पैसा त्यात खर्च होतो. नुकताच जो अमेरिकेशी करार करण्यात आला तो १५ अब्ज डॉलर्सचा होता. ब्रिटन, फ्रान्स हे शस्त्रास्त्रे पुरवणारे आणखी मोठे देश. एकट्या अमेरिकेशीच आजवरचे व्यवहार [फक्त शस्त्रांचे] १८ अब्ज डॉलर्सचे आहेत !

३) राष्ट्रीय प्रकल्पांसाठी आणि पंचवार्षिक योजनांसाठी उरलेला पैसा खर्च होतो खरी गंमत इथेच आहे. सगळे प्रकल्प मल्टीनॅशनल कंपन्यांचे आहेत. त्यामुळे अप्रत्यक्षपणे बराचसा पैसा यांच्याच खिशात जातो. ऑटो इंडस्ट्री रेनॉल्ट, ख्रिसलर, पेट्रोकेमिकल्स ड्युपाँ, युनियन कार्बाइड, स्टील थिसेन, क्रूसोलूरी ही वानगीदाखल दिलेली उदाहरणे.

**आधुनिकीकरणाचा फुगा :** इथेच शहाने आधुनिकीकरण केल्याचा दावा खोटा ठरतो. इराणियन बूर्ज्वाझींना व शहाला तात्कालिक फायदा भरपूर आहे; परंतु शेवटी देश घशात जाणार तो अमेरिकन भांडवलदारांच्याच किंवा जगातल्या मोठ्या भांडवलदारांच्या, ही काळ्या दगडावरची रेघ होती. कारण मूलत: प्रचंड कारखाने वसवूनही इराण यंत्रज्ञानाबद्दल अज्ञानीच आहे. डॉक्टर्स, इंजिनिअर्स विकतच जर घेता येत असतील [ दुसर्‍या देशातले ] तर आपण राबायचंच कशासाठी, असा सरळ, साधा, सोपा विचार प्रत्येक क्षेत्रात आज माजलेला आहे. वर्षाला दीड लाख यंत्रे करणार्‍या धुण्याच्या यंत्रांचा कारखाना तेहरानमध्ये आणि पार्ट न् पार्ट इटलीहून आयात केलेला. तिथं होणार ती फक्त फिटींग ! हे इराणचे आधुनिकीकरण ! स्टेपलरची पिन सुद्धा ज्या देशाला स्वत:च्या बुद्धीवर करता येऊ नये, आणून ठेवलेली आधुनिक यंत्रे जरा बिघडली, की परदेशी इंजिनिअरचे पाय धरायला लागावेत इतकी वाईट परिस्थिती आज आहे. परदेशी तंत्रज्ञ जर रातोरात देशाबाहेर गेले ! [ जे आज मोठ्या प्रमाणावर होत आहे ] तर देश अक्षरश: बंद पडेल.

केवळ पेट्रोलच नव्हे, तर नॅचरल गॅसही इराणमध्ये मोठ्या प्रमाणात सापडतो. हा सोविएत रशियाला आणि पश्चिम जर्मनीला निर्यात करून पैसा मिळवला जातो.

गेल्या पाच–सात वर्षातल्या या प्रचंड पैशाच्या ओघामुळे श्रीमंत आणि गरीब यांच्यातले अंतर मात्र प्रचंड वाढले. कॉम्प्रादोर बूर्ज्वाझींनी लघुउद्योग बळकावून ते गबर झाले. सरकारी नोकर तर केवळ भ्रष्टच झाले. प्रासादतुल्य घरे बांधून सुट्टीला लंडन–पॅरिस–न्यूयॉर्कच्या वार्‍या करणे हाच एक उद्योग त्यांना उरला. आठवड्याला शंभर हिलमन बाहेर काढणार्‍या कारखान्याची वेटिंग लिस्ट वाढतेच आहे आणि यांचे फेडेड जीन्स घातलेले शाहजादे पाश्चात्य संगीतावर गिटार वाजवत रंगेलपणे वागत आहेत अशी एका टोकाची परिस्थिती, तर दुसरीकडे ग्रामीण भागात शेतीची किंमत राहिली नसल्याने शहराकडे ओघ आणि झोपडपट्ट्यांची संख्या वाढतेच आहे. हे फार काळ चालू शकतच नव्हते.

निदान भारतात आहे तशी जरी लोकशाही असती, तरीही प्रेशर व्हॉल्व्हप्रमाणे हा साठलेला असंतोष हळूहळू बाहेर पडला असता; पण मुक्त प्रेस नाही, कामगारांना संपाचा अधिकार नाही या परिस्थितीत सगळं वरून छानच दिसत होतं आणि आत नुसता पोखरलेला सांगडा होता. सरकारच्या प्रत्येक लहान–मोठ्या खात्यात लाचलुचपत पोचली. पंचतारांकित होटेल्स, जुगार, डिस्कोथेक्स् सगळं फळफळलं. असणार्‍यांचा पैसा यातच जायला लागला.

---

इराणची श्वेतक्रांती किती पोकळ होती हे त्या वेळच्या पंतप्रधानाच्या उद्गारांवरून स्पष्ट व्हावे. अली अमिनी हा त्या वेळेला पंतप्रधान होता. तो स्वत: मोठा जमीनदार होता. त्याने तेव्हा म्हटले होते–

' भू-पुनर्रचनेच्या बाबतीत मी माझ्या वर्गमित्रांच्या वतीने युद्ध पुकारतो. कोणत्याही परिस्थितीत सामान्यांचा संताप पेटता कामा नये. तसे झाले तर त्या वणव्यात शहासकट आम्हा सर्वांचीच आहुती पडेल. '

आज हीच भविष्यवाणी खरी ठरली आहे. ◻

या साऱ्यामुळे चलनफुगवटा ३५ टक्क्यांवर पोचला आणि बुडणारे आणखीच बुडायला लागले.

१९७७ मध्ये बुडबुडा फुटला आणि सरकारने आर्थिक धोरणाच्या बाबतीत मार खाल्ला आहे हे सर्वांना कळून चुकले. १९७८ च्या अंदाजपत्रकातच दोन अब्ज डॉलर्सची तूट होती आणि वाढीचा वेग अडीच टक्क्याने कमी झाला.

फक्त पेट्रो डॉलर्सच्या जोरावर एके काळी अमेरिकेची जरा नादुरुस्त झालेली सहाशे हेलिकॉप्टर्स एकहाती विकत घेणारा शहा त्यामुळेच कामगार संपावर गेले तेव्हा खरा हादरला. पेट्रोलखेरीज इराण, ही कल्पनाच अशक्य आहे. मुळात कृषिप्रधान असणारा हा देश आता धड इकडाचा ना तिकडचा झालेला आहे आणि त्यात ही बोंब ! ◻

## Savak चे अन्तरंग

या साऱ्याचा परिपाक म्हणजे सध्याची चळवळ. एक मात्र नक्की की इराणचा प्रश्न अधिक गंभीर करण्याचे श्रेय Savak ला पुरेपूर जाते. Savak ही आपल्याकडे इंदिरा गांधींनी जशी Raw लाडावून ठेवली होती, तशीच शहाने तिकडे लाडावून ठेवलेली संघटना होती. खास विश्वासातील माणसेच शहा यामध्ये नेमत असे आणि राजकीय विरोधकांना वेळ पडल्यास ठार मारून पण वाटेतून वगळणे हे काम ते लोक निष्ठेने पार पाडत. या गुप्तहेर संघटनेतर्फे किती राजकीय विरोधक नष्ट करण्यात आले याची खरी मोजदाद करणेच अशक्य आहे. शहा माहितीसाठी पूर्णतः या संघटनेवर अवलंबून असे.

ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संघटनेने मध्यंतरी एक अहवाल प्रसिद्ध केला. त्यामध्ये इराणच्या शहाच्या दडपशाही कारभाराची विस्तृत माहिती देण्यात आली आहे. राजकीय विरोधकांना लष्करी कोर्टापुढे उभे करून खतम करायचे, हा मार्ग शहाने अवलंबिला होता. तसेच कोर्टातर्फे जी चौकशी व्हायची ती पूर्णतः एकतर्फी असायची. तिचे काही प्रमुख पैलू पाहिले तरी ही गोष्ट स्पष्ट होईल.

१) कैद झाल्यानंतर आरोपीला कोणताही कायदेविषयक सल्ला घेण्याची परवानगी नसे.

२) चौकशी सुरू होण्यापूर्वी दीर्घकाळपर्यंत तुरुंगात ठेवण्यात येत असे; या कालावधीतही कायदेविषयक सल्ला घेता येत नसे आणि अमानुष हाल सहन करावे लागत.

३) नॅशनल इंटेलिजन्स अँड सिक्युरिटी ऑर्गनायझेशन (NISO) ही आपल्याकडच्या CBI सारखी इराण सरकारची संस्था. या संस्थेतर्फेच सर्व चौकशी गुप्तपणे होत असे. सरकारवर उलटणार नाहीत याची खात्री असलेले लष्करी अधिकारी आरोपीचे वकील म्हणून देण्यात येत असत व तेही चौकशीआधी आरोपीला भेटू शकत नसत.

४) आरोपीला त्याच्यावरील आरोपांची फाइल पंधरा दिवसांसाठी अभ्यासायला मंजुरी असे; पण ती कोर्टाच्या ऑफिसातच पहावी लागे आणि त्याची स्वतःसाठी प्रत काढता येत नसे.

५) चौकशी चालू असताना साक्षीदारांना बोलावण्याची सक्ती न्यायाधिशावर नसे. म्हणजेच, आरोपी साक्षीदारांची उलटतपासणी घेऊ शकत नसे; पण सगळा खटला मात्र याच साक्षीदारांच्या साक्षींवर चालत असे आणि आरोपीला शिक्षा होत असे.

यावरून या बिनबुडाच्या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात यावं. इराणची राजधानी तेहरान येथे चाललेल्या अशाच एका फार्सिकल चौकशीला ब्रायन रॉबेल हा ब्रिटिश बॅरिस्टर हजर होता. त्याने दिलेल्या माहितीवरूनच ॲम्नेस्टीने हा अहवाल तयार केला.

### तुम मुझे खून दो, मैं तुम्हे मौत दूँगा।

अर्थात रॉब्रेलने न्यायालयात जे काही पाहिलं आणि ऐकलं असेल त्याहूनही भयंकर आणि अविश्वासार्ह गोष्टी प्रत्यक्ष तुरुंगात घडत असत. आश्रफ डेहगनी या २९ वर्षांच्या क्रांतिकारक युवतीचा तुरुंगवासात असताना जो छळ झाला तो तिने 'Torture and Resistance in Iran' या पुस्तकात नोंदला आहे. एका गरीब कामकरी कुटुंबात आश्रफचा जन्म झाला. आझरबैजान या खेड्यात शिक्षिकेचा व्यवसाय करीत असतानाच ती इराणमधील क्रांतिकारकांच्या संघटनेकडे आकृष्ट झाली. १९७१ साली आश्रफला शहाविरोधी कारवायांबद्दल अटक करण्यात आली. तुरुंगामध्ये तिचा भरपूर छळ करण्यात आला आणि नंतर तिच्यावर वर उल्लेखिलेल्या 'मार्गदर्शक तत्त्वां'नुसार खटला भरण्यात आला. अर्थातच न्यायाधीश महाराजांनी दहा वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. परंतु १९७३ च्या मार्चमध्येच आश्रफ तुरुंगातून निसटली आणि पुन्हा संघटनेत दाखल झाली. आश्रफ सांगते—

'...पोलीस इंटेलिजन्स डिपार्टमेंटच्या आवारात गाडी थांबली. मला ओढूनच बाहेर काढण्यात आलं आणि ओढत, ढकलत, लाथा मारत 'Interrogation Room'कडे नेण्यात आलं. एकीकडे तोंडाने शिव्यांचा आणि हातांनी बुक्क्यांचा मार चालूच होता. मला ते सहन झालं नाही. मीही त्यांच्याबद्दल मला वाटणारी चीड, तिरस्कार बोलून टाकायला लागले. ती ऐकून ते अधिकारी आणखीनच चिडले. त्यांनी पुन्हा मला एकमेकांकडे ढकलत थोबाडीत मारणं, गुद्दे मारणं, लाथा मारणं सुरू केलं. माझ्या अंगावरील कपड्यांच्या चिंध्या झाल्या होत्या. थोड्याच वेळात शहाचा निकटवर्ती समजला जाणारा आणि या इंटेलिजन्स डिपार्टमेंटचा प्रमुख खटाय हा आला आणि तो त्या अधिकाऱ्यांनाच दम भरू लागला—

'तुम्ही हे काय करता ? तुम्हाला कैद्यांना आदराने वागवता येत नाही ? हिच्याकडून तुम्हाला काय हवंय ? तिचा पत्ता ? मग तो

---

अमीर परवीझ या एका गुरिला नेत्याच्या म्हणण्यानुसार इराणी समाजात दोन अढळ गोष्टी आहेत. त्या म्हणजे लोकांना तथाकथित अढळ सत्तेबद्दल वाटणारी अढळ भीती. आमच्यापुढील समस्या या दोन्ही अढळ गोष्टी नष्ट करण्याची आहे. आज या दोन्ही गोष्टी नष्ट झाल्या आहेत; पण समस्येचे काय ? ◻

मारहाण न करतादेखील मिळवता येईल !'

आधी भरपूर मारहाण करायची आणि नंतर दयेचा मोठा आव आणायचा हे याचं तंत्र मला माहिती होतं. खटाय मला म्हणू लागला–

'आम्ही तुझं भलं चिंतणारे आहोत. तुझा खरा पत्ता सांग. कारण तुझ्या मित्रांना जितक्या लवकर अटक होईल तितकं ते त्यांच्याच हिताचं आहे. कारण तेवढे त्यांचे अपराधही कमी असतील. चांगल्या, सुशिक्षित तरुणांनी अशा तऱ्हेने हकनाक मरणं लाजिरवाणंच नव्हे का ?'

त्या पशूकडे पाहात मी ओरडले– 'तू मानवजातीचा शत्रू आहेस. मी कधीही शरण येणार नाही. मी शेवटपर्यंत लढत राहीन ! ...'

'आता मात्र त्याच्या चेहऱ्यावरचा दयाळूपणाचा भाव ओसरायला लागला, त्या सर्वांनी मिळून मला एका पलंगाला बांधलं. बरेचजण नुसतंच पाहात बसले होते. कदाचित क्रांतिकारक स्त्रीचा छळ पाहाण्यात त्यांना गंमत वाटत असेल त्या सर्व छळ करणाऱ्यांचा कॅप्टन निक्ताब हा प्रमुख होता. आता ते माझ्या पायांच्या तळव्यांवर जोरदार फटके मारू लागले. माझी सहनशक्ती कमी कमी व्हायला लागली; पण क्रांतीची गीतं आणि घोषणा देत मी तो मार सहन केला. विशेषत: शहाबद्दल काही म्हटलं की, या अधिकाऱ्यांना जास्त राग येत असे.

मला असह्य वेदना होऊ लागल्या. मला विचार करण्यासाठी, माझी मानसिक शक्ती पुन्हा एकवटण्यासाठी अवधी हवा होता. मी म्हटलं, ' ...त्या रस्त्याचं नाव आहे खानी आबाद.' त्या सर्वांचे चेहरे आनंदाने फुलले. थोडा वेळ मारणं थांबलं, पण पुन्हा सुरू झालं. मी संपूर्ण पत्ता देणार नाही, हेही त्यांच्या लक्षात आलं. त्यामुळे मी जेवढा पत्ता दिला होता त्याच्या आधारेच अधिकाऱ्यांचा एक ताफा शोधावर निघाला. माझे पलंगाला बांधलेले हात–पाय सोडण्यात आले आणि मला चालायला सांगण्यात आले. मी जमिनीवर पाय टेकवले. शेकडो टाचण्या किंवा सुया अंगात घुसत असल्याचा मला भास झाला; पण त्या अधिकाऱ्यांना खोटा पत्ता देऊन गावात भरपूर भटकायला लावल्याचा आसुरी आनंदही झाला होता.

'एव्हाना दुपार झाली होती. एक माणूस हातात दोन खाद्य पदार्थांच्या थाळ्या घेऊन आला. थाळ्यांमध्ये काटे–चमचेही होते. अर्थात या थाळ्या रखवालदारांसाठी होत्या. त्याने मलाही जेवणार का, म्हणून विचारलं. मला एक युक्ती सुचली. मी तत्काळ हो म्हटलं. मी खात असताना सुरुवातीला काही वेळ तो रखवालदार माझ्यावर लक्ष ठेवून होता; पण नंतर तो स्वत:च्या पुढ्यातलं खाऊ लागला. ती संधी मी साधली आणि हातातला काटा माझ्या घशात जेवढा कोंबता येईल तेवढा कोंबण्याचा प्रयत्न केला. मला वाटलं होतं, अशा तऱ्हेने सहज मरता येईल; पण ते शक्य होत नव्हतं. इतक्यात एका अधिकाऱ्याचं माझ्याकडं लक्ष गेलं आणि माझ्यावर जवळजवळ झेप टाकतच त्याने तो काटा हस्तगत केला. एव्हाना मी दिलेला पत्ता शोधून शोधून दमलेलं पथकही परत आलं होतं. पत्ता न सापडल्यामुळं ते खूपच खवळलेले दिसत होते.

'पुन्हा छळणुकीला सुरवात झाली. आता ते मला विजेचे शॉक देऊ लागले. त्यांनी मला संपूर्णपणे नग्न केलं होतं. बीभत्स शिव्या देत आणि गलिच्छ विनोद करत ते माझ्या शरीराच्या संवेदनाक्षम भागांना शॉक देऊ लागले. इतक्यात तो नराधम कॅप्टन निक्ताब परत आला. त्याने मला एका बाकड्यावर पालथं झोपवलं. माझे हात-पाय बांधले आणि माझ्यावर बलात्कार केला. मी अतिशय संतापले. माझ्या डोळ्यांत रक्त जमा होऊ लागलं; पण मी पुन्हा स्वत:ला सावरले. मला त्यांना हे दाखवून द्यायचं होतं की, त्यांच्या या निर्लज्जपणाचा, नीचपणाचा माझ्यावर काहीही परिणाम होणार नव्हता. ज्या उच्च ध्येयासाठी मी झगडत होते त्या क्रांतीसाठी मला हे सगळं सहन करायलाच हवं होतं आणि हा छळ, हा अत्याचार माझ्यावर फारच थोडा वेळ होत होता; पण माझे असे असंख्य इराणी बांधव आहेत की, ज्यांनी असे अत्याचार काही क्षण, काही तास, काही दिवसच सहन केलेले नाहीत, तर कष्टमय जीवनातील प्रत्येक क्षणी असे अत्याचार ते सहन करत आहेत. एखाद्या अपत्याला जन्म देणाऱ्या मातेप्रमाणे माझी अवस्था होती. अशा वेळी वाट पहात थांबण्यापलीकडे काहीही करता येत नाही. प्रसूतीनंतर वेदना आपोआप थांबतात; पण माझ्याबाबतीत मात्र त्या मृत्यूनंतरच थांबणार होत्या आणि मला त्याचीच वाट पहात थांबायचं होतं.' □

## सब लाल हो जाएगा ?

सोळा जानेवारीला शहा देश सोडून गेला, तरी सुद्धा अजूनही इराण अशांतच आहे. शापूर बख्तियार हा सध्याचा पंतप्रधान लोकमान्य नाही. विरोधी गटांनी त्याच्या पक्षावर बहिष्कार टाकलेला आहे. त्यामुळेच इराणच्या दंगली ओसरण्याचे चिन्ह नाही. बख्तियार सत्तेवर आल्यानंतर संरक्षणमंत्र्याने राजिनामा दिला; मजलिसमधले १२–१५ जणही या १८ तारखेला राजीनामा देऊन बाहेर पडले. त्यामुळे मजलिसपासून रस्त्यापर्यंत त्याला विरोध होतोच आहे. इराणचे तारू पैलतीरी लावण्यात तो यशस्वी होण्याची शक्यता फार कमी आहे.

मुळात शहाची पोकळी भरून काढणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा नेता इराणकडे नाही. विरोधक विभिन्न पक्षांचे, विभिन्न आदर्श मानणारे आहेत. आजचे विरोधक हे मुख्यत: दोन गटांचे आहेत. एक गुरीला गट आणि दुसरा इस्लामिक गट. इस्लामिक गटाला बराच पाठिंबा खालच्या मध्यमवर्गातून आहे. बुद्धिवंतांचाही मोठ्या प्रमाणात या गटाला पाठिंबा आहे.

याचे कारण उघड आहे. शहाने पश्चिमेची मूल्ये आपल्या समाजावर वरून लादली. प्रत्येक समाजाची प्रगती ही निराळ्याच अंगाने त्या समाजाच्या स्वत:च्या अंगाने व्हावी लागते. तेवढा अवसरही न देता शहाने ही प्रमुख चूक केली. सत्तालालसेपायी इतर चुका ओघाने घडत गेल्या.

पश्चिमेचे पुत्र म्हणवताना आर्यांचा वारसा सांगण्यातही शहाला अभिमान वाटत असे. मनात आणले तर पश्चिमेचे नाक केव्हाही मी दाबू शकतो, ही दर्पोक्ती तो वारंवार करीत असे; पण पश्चिमेकडे तो आदर्शासाठी बघत असे.

यामध्ये समाजाची फरफट झाली. त्याची लयच बिघडून गेली. आम्ही नक्की कोण ? पौर्वात्य की पाश्चिमात्य ? हा प्रश्न मूलतः या पिढीला जाणवू लागला. भौतिक समृद्धी गाठूनही आत्मसंदेह फिटला नाही; कारण तेलाच्या चमत्काराने दारात धनराशी ओतल्या; पण ज्ञान मिळवायला लागणारी आचच नष्ट केली. यातून समाज दोलायमान झाला. नक्की काय चुकते हे जेव्हा कळेना तेव्हा हरवलेला सूर सापडवताना प्रथम शहाच बळी गेला. आजपर्यंतची सगळी तथाकथित प्रगती मीच केली, असे तो म्हणत होता. आता देश किती भयानक स्वरूपात विकला गेला आहे हे पाहिल्यावर लोक त्याच्याच जिवावर उठले.

आयेतोल्ला खोमेनीला परवापर्यंत सत्ता नको होती; पण सध्याच्या त्याच्या विधानांवरून हा विचार बदललेला दिसतो. तसे झाले तर इराणवर ही आपत्तीच ठरेल. इराण इस्लामिक रिपब्लिक करण्याची खोमेनीची इच्छा आहे. त्याबरोबरच कुराण शरियतचा कायदा तो अस्तित्वात आणू इच्छितो. गुन्हेगारांना फटके, हात तोडणे इत्यादींच्या युगात इराण परतणे (दीर्घकालीनदृष्टचा) अशक्य आहे. मुल्ला-मोलवींचे स्वतःचे हितसंबंध असल्याने त्यांना सत्ता हवी आहे. काही काळ ती मिळेलही, पण टिकणार नाही. मास कॉन्शसनेस अशा एका पातळीपर्यंत पोचला आहे की, सध्या शहा तर गेला या आनंदात जरी काही काळ खोमेनीला स्वीकारले तरी तोही दीर्घकाळ टिकू शकणार नाही.

विरोधकातील दुसरी संघटना मार्क्सिस्ट लेनिनिस्ट आहे. त्यांच्या एकूण बुद्धिमत्तेवर आणि परिस्थिती समजावून घेण्यावर समाजाची दिशा अवलंबून आहे. इस्लामिक रिपब्लिक या दिशेने अंधार आहे म्हटल्यावर याच एका संघटनेकडे वळणे अपरिहार्य आहे. याच संघटनेने रक्ताचा मोबदला दिलेला आहे आणि इस्लाम त्यांनाही परत नको आहे. शहाने निदान जितके पुढे आणले तिथून मागे फिरण्यात तर काहीच हशील नाही, हे बुद्धिवंतांनाही कळते आहे.

मात्र अशा इराणमध्ये परदेशी भांडवल फारसे गुंतण्याची शक्यता नाही. रशियाविषयी मार्क्सिस्ट जपूनच बोलतात. रशियाचा अमेरिकेला विरोध, इथपर्यंत पाठिंबा असणार. मात्र ब्रिटन, अमेरिका यांच्या परराष्ट्रीय धोरणांना जबरदस्त धक्का बसला आहे.

सध्या इराणही बेचिराखच झालेला आहे. प्रचंड युद्धानंतरही हाती काहीच न लागल्याचे कळल्याने चित्त सैरभैर व्हावे तसे आज झाले आहे. शहाच्या जाण्याने प्रश्न सुटलेले नाहीत,उलटअधिक खऱ्या व नग्न स्वरूपात ते पुढे ठाकले आहेत. समाजाने पहिला विजय तर मिळवला. पण प्रतिक्रियात्मक आणि विरोधात्मक विजय मिळविणे सोपे असते. एखादी व्यक्ती नको, हे आंदोलन सोपे असते; पण समांतर कार्यक्रमाद्वारे त्याच्या अंमलबजावणीने राष्ट्र पुढे नेणे सोपे नव्हे.

तेलाचा पैसा, इराणसाठी मल्टि-नॅशनल्सची हकालपट्टी आणि लष्करी खर्च कमी ही आता त्रिसूत्री रहाणार. लष्कर शहाला एकनिष्ठ होते, आता त्यातही फाटाफूट होऊन ते दुबळे होणार. तंत्रज्ञान देशाबाहेर जाणे फारच धोक्याचे आहे. सध्या अशा परिस्थितीत देश आहे की, प्रचंड अब्जावधी डॉलर्सचा—राष्ट्रीय नाश झालेलाच आहे. यातून पुनर्निर्मिती करायची तर तेवढ्याच निष्ठेने कामाला लागायला हवे; पण अजून कम्युनिस्टांचे साध्य साधले गेलेले नाही. अंतर्गत यादवी आता सुरू होण्याची खरी शक्यता आहे. इस्लामिक मार्क्सिस्ट ही संकल्पनाच चूक आहे. गोंधळलेल्या समाजाच्या गोंधळलेल्या मनःस्थितीचे ते द्योतक आहे. यांच्यातील कोणी तरी एकच जगेल, तोही दुसऱ्याचा नीट बळी घेऊन. त्यामुळे आजवर रस्तोरस्ती जे मुडदे पडले, ते घरोघरी पडतील. या भयानकतेला पर्याय नाही.

एका स्तिमित करणाऱ्या वेगाने उभी राहिलेली चळवळ राष्ट्राच्या संपत्तीचा प्रचंड घास घेऊन सध्या धापा टाकते आहे. कोणत्या दिशेला जायचे याचा संदिग्ध निर्णय घेतल्याने समस्या बिकट होतील. एक ना एक दिवस आपला रीदम सापडेपर्यंत ही अंधारयात्रा चालूच रहाणार.

असेच चाचपडत असताना पुरेसा मोबदला दिल्यानंतर इराणलाही आत्मा गवसेल.

पण तेव्हा कदाचित यशापेक्षा किंमत जास्त द्यावी लागलेली असेल ! □



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

# २६ जानेवारी

**आजच्या या पवित्र वर्धापन दिनीं—**

भारतीय गणराज्याचा त्रिवार जयजयकार

याच दिनीं, ४९ वर्षांपूर्वी, आम्ही पूर्ण स्वराज मिळविण्याचा आमचा निर्धार जाहीर केला.

याच दिनीं, १९५० सालीं, आम्ही भारतीय गणराज्याची घोषणा केली आणि न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुभाव या आदर्शांवर आधारित राज्य घटनेचा स्वीकार केला.

याच दिवसाच्या आसपास, दोन वर्षांपूर्वी, आमच्या राज्यघटनेंत हमी देण्यात आलेल्या लोकशाही पद्धतींच्या पुनर्स्थापनेसाठी आम्ही परतीचा प्रवास प्रारंभ केला.

या वर्धापन दिनाच्या निमित्तानें,

**आमचे स्वातंत्र्य आम्हाला पुन्हा मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करूं या.**

**स्वातंत्र्य आणि समता यांसाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुति दिली, त्यांची स्वप्नें साकार करण्यासाठीं आपण झटूं या.**

**शक्यतोंवर, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळविण्यासाठीं आपण निर्धारानें प्रयत्न करूं या.**

davp

पुस्तके

# इराणमधील छळ आणि प्रतिकार

**बुद्धचाचि वाण धरिले ...!**

इराणमधील अलीकडच्या राजकीय घटनांनी साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. राजसत्तेविरुद्ध सुरू असलेला जनतेचा उठाव काबूत आणण्यास इराणच्या शहांना संपूर्ण अपयश आल्याने देशत्याग करण्यावाचून त्यांना गत्यंतर राहिले नाही.

त्यांच्या मागे इराणचा कारभार पाहण्यासाठी एक मंडळ नियुक्त करण्यात आले असून पंतप्रधान डॉ. शाफर बख्तिआर यांच्यावर विश्वास व्यक्त करण्यात आल्याचे वृत्तही प्रसिद्ध झाले आहे. इराणमधील जनतेच्या ह्या उठावासंबंधी विवेचनात्मक अशी जी वृत्ते अधूनमधून वाचण्यात येत होती किंवा इराणच्या भारतातील विद्यार्थ्यांकडून जी निदर्शने केली जात होती त्यावरून ह्या आंदोलनाच्या पाठीमागे नेमक्या कोणत्या शक्ती कार्यप्रवण होत्या त्याची अचूक कल्पना येण्यास फारशी मदत होत नाही. त्यामुळे इराणमधील ऑर्गनायझेशन ऑफ इराणियन पिपल्स फेडाई गोरीलाज–च्या (O. I. P. F. G.) प्रमुख सदस्या श्रीमती आश्रफ डेहगानी यांचे 'इराण मधील छळ आणि प्रतिकार' याबद्दलचे भयंकर स्वानुभव सांगणारे छोटेसे इंग्रजी पुस्तक हातात पडल्याबरोबर मी त्यावर जवळजवळ तुटूनच पडलो. पुस्तकाची सुरुवात अश्रफबाईंना अटक झाल्यापासून होते. तुरुंगात त्यांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा कसकसा छळ होतो, हा छळ होत असतानाच त्या पोलिसखात्याशी आतून प्रतिकाराची लढाई कशी देतात, आपल्या सहकाऱ्यांचे नीतिधैर्य टिकून रहावे म्हणून काय काय उपाय योजतात, त्याचप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांना अनेक बाबतीत नामोहरम कसे करून टाकतात आणि शेवटी नववर्षारंभी तुरुंगात जराशी ढिलाई आल्याबरोबर भेटीला येणाऱ्या बायांच्या घोळक्यातून निसटून कशा जातात त्याचा बराचसा रोमांचकारी इतिहास ह्या छोट्याशा पुस्तकात वाचावयास मिळतो.

कैद्यांना गुरासारखे झोडपून काढणे, त्यांच्या गुह्यांगांना वीजेचे शॉक देणे, स्त्री-कैद्यांना विवस्त्र स्थितीत त्यांच्या सहकाऱ्यांसमोर उभे करून त्यांची विटंबना करणे, अंगावर विष्ठा टाकणे व ती तोंडात कोंबणे ह्यासारखे अमानुष प्रकार वाचताना सुसंस्कृत मन हबकून गेल्याशिवाय रहात नाही.

पण हे सारं वाचत असताना या हाल-अपेष्टा सहन करण्यामागे गनिमी दलातील सैनिकांनी आत्मसात केलेली दुर्दम्य ध्येयनिष्ठा आणि अंतिम विजयासंबंधीचा त्यांचा आत्मविश्वास ह्या गोष्टी प्रकर्षाने जाणवल्याशिवाय राहात नाहीत. गनिमी दलाची ही संघटना अर्थातच मार्क्सवादावर निष्ठा बाळगणाऱ्यांची आहे. प्रसिद्ध गनिमी नेता चे गव्हेरा याला ते गुरुस्थानी मानतात व जगात सर्वत्र साम्राज्यशाहीविरोधी लढा देण्याचे जे प्रचंड ऐतिहासिक कार्य सुरू आहे त्याचाच आपला लढा हा एक भाग आहे, असे ते मानतात. त्यामुळे साहजिकच इराणमधील त्यांचा लढा हाही साम्राज्यशाहीविरोधी लढा आहे आणि इराणमधील शहांच्या शासनातील लहान-मोठे सर्व अधिकारी म्हणजे साम्राज्य शाहीचे हस्तक, हे समीकरण त्यांनी मनाशी घट्ट धरून ठेवलेले दिसते. आता मुळात इराणमधील शहांच्या सत्तेविरुद्ध सुरू असलेला जनतेचा लढा हा खरोखरी साम्राज्यशाहीविरोधी लढा आहे का ? इराणचा शहा हा मार्क्सच्या व्याख्येप्रमाणे साम्राज्यवादी ठरतो का ? सरंजामशाही अवस्थेच्या पलीकडे, फार तर विकसित होऊ लागलेल्या भांडवलशाही अवस्थेच्या पलिकडे आजचा इराण गेलेला आहे का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात व तेथील जनतेच्या उठावात आज ज्या निरनिराळ्या शक्ती आघाडीवर दिसतात त्यावरून ह्या प्रश्नांना विशेष महत्त्व प्राप्त होते. परंतु इराणमधील गनिमी दलाची मात्र अशी ठाम निष्ठा आहे की, तेथील लढा हा साम्राज्यशाही विरोधी लढ्याचाच भाग आहे.

ह्या बाबतीत त्यांचा ठोकळेबाजपणा किती मर्यादेपर्यंत जाऊ शकतो त्याची दोन मजेदार उदाहरणे ह्या पुस्तकात येऊन गेली आहेत. आश्रफ डेहगानीने तिच्याबरोबर तुरुंगात असलेल्या काही बिगर राजकीय कैद्यांचा परिचय करून दिला आहे. त्यांपैकी एक सतरा वर्षांची अशिक्षित फोर्झन नावाची एका गरीब कुटुंबातील मुलगी. तिचे आई-वडील लहानपणीच वारलेले असतात व ती आपली बहीण व मेहुणा ह्यांच्या घरी रहात असते. पोरवयातच एका सिनेमानटाकडे ती आकर्षित होते. तिच्या शेजारचा एक मुलगा त्या नटाशी तुझी ओळख करून देतो, असे सांगून, फसवून तिला शहरात घेऊन जातो व पुढे काही दिवसांनी तिला वाऱ्यावर सोडून देतो. परत बहिणीकडे जाण्यास तिला तोंड नसते आणि शेवटी ती वेश्यांच्या तडाख्यात सापडते. वेश्याव्यवसाय केल्याबद्दल तिला दंड होतो, म्हणून तिला तुरुंगात पाठवतात. तोपर्यंत तिला दिवस गेलेले असतात. तुरुंगात आयतेच आपले बाळंतपण व्यवस्थित पार पडेल अशा खुशीत ती असते. परंतु त्यापूर्वीच तिची सुटका होते. त्यामुळे काही तरी किरकोळ गुन्हा करून ती पुन्हा तुरुंगात येते आणि तेथेच प्रसूत होते. स्वतःपुरते किंवा बाळापुरते कपडेही तिच्याजवळ नसतात. थंडी कडाक्याची पडलेली असते. बाहेर बर्फाचा वर्षाव होत असतो. तिच्या पोटात कळा येत असतात. प्रसूत होऊन अवघे तीन दिवस झालेले असतात. आपली इतक्यात मुक्तता करू नका, निदान काही तास तरी मला येथे राहू द्या असे ती परोपरीने विनवते; परंतु कोणीच तिच्याकडे लक्ष देत नाही आणि तिला जेलमधून हाकलून दिले जाते.

सकीना ही आश्रफबरोबर असलेली दुसरी एक दुर्दैवी कैदी. तीन मुलांच्या या आईचा नवरा सतत तीन–चार वर्षे बेकार असतो, त्यातच त्याला वेड लागते आणि तो मरण पावतो. ती एका सधन शेतकऱ्याच्या

शेतावर मोलमजुरी करून कशी तरी गुजराण करीत असते. आपल्या हक्काविषयी जागरूक असलेली ही तिखट बाई मालकाचा उणा-दुणा शब्द ऐकून घेत नाही. त्यामुळे तो तिच्यावर चिडलेला असतो आणि तिला काढून टाकायला कारण शोधत असतो. दरम्यान ती पुनर्विवाह करते. त्या नवऱ्यापासून तिला मूल होते; पण ते जन्मतःच मेलेले असते. तिच्यावर आणि तिच्या नवऱ्यावर तिचा मालक भ्रूणहत्येचा आरोप ठेवतो. कोर्टापुढील जाबजबान्या तिला न समजणाऱ्या पर्शियन भाषेत होतात आणि तिचे म्हणणे ऐकून न घेताच तिला शिक्षा ठोठावली जाते.

ह्या दोन्ही उदाहरणांतील स्त्रिया समाजातील विषम व्यवस्थेची शिकार बनलेल्या असतात; पण त्यात साम्राज्यशाहीविरोधी लढ्याचा कसलाच संबंध दिसत नाही.

इराणमधील हे गनिमी दस्ते नेमके केव्हा सुरू झाले आणि त्यांनी काय काय कार्य केले त्याचा तपशीलवार वृत्तान्त पुस्तकात मिळत नाही. १९७१ च्या फेब्रुवारीत सिहंकलमधील लढाईचा ओझरता उल्लेख त्यात आहे. असे दिसते की, त्या वेळी गनिमी दस्त्यांनी शहाच्या एका छावणीवर हल्ला चढवला होता. शहाचे एक हेलिकॉप्टर पाडल्याचे व ते चालवणाऱ्या एका अधिकाऱ्याला ठार मारल्याचाही उल्लेख या ठिकाणी आहे. तसेच एके ठिकाणी शहाच्या एका अधिकाऱ्याला गनिमी दलाने जनतेच्या वतीने जनतेच्या कोर्टात देहदंडाची सजा फर्मावली व ती अंमलात आणल्याची घटनाही पुस्तकात नमूद करण्यात आली आहे; पण त्यापेक्षा लढ्यासंबंधीचा अधिक तपशील वाचावयास मिळत नाही व त्या दृष्टीने पुस्तक अपुरे वाटते. गनिमी दलाच्या सुरुवातीचाच तो काळ असल्यामुळे भूमिगत चळवळीतील कमकुवत दुवे कोणते होते, पोलिसांपासून बचाव करण्याच्या दृष्टीने कोणत्या गोष्टी करता येण्यासारख्या होत्या व त्यात कार्यकर्ते कमी कसे पडले याची पुढील कार्यकर्त्यांना उपयोगी पडावी याची चर्चा मात्र लेखिकेने केली आहे.

आश्रफचं तुरुंगातून पलायन हे शेवटचे प्रकरण मजेदार आहे. महिनोन्महिने आणि रात्रंदिवस हात-पाय बाकाला जखडून ठेवण्यात येणाऱ्या कैद्यांची पुढे तुरुंगात रवानगी झाल्यावर त्यांच्या परिस्थितीत बरीच सुधारणा होते. छळ संपतो आणि जरा मोकळेपणाने हिंडता-फिरता येते. इतर कैद्यांशी थोडे-फार बोलणे-चालणे करता येऊ लागते. सगळ्याच ठिकाणचा अनुभव असा आहे की, कोठलाही तुरुंग सतत तितका कडक रहात नाही. अधूनमधून त्यात थोडी-फार ढिलाई येते. आश्रफला आणि तिच्या सहकाऱ्यांना ठेवलेल्या कासर्फ तुरुंगाची परिस्थिती तशीच असली तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही; पण नवल वाटते ते याचे की, इराणी नववर्षाच्या निमित्ताने तुरुंगाची अवस्था 'आवो-जावो घर तुम्हारा' अशी होऊन जाते. कैद्यांना भेटण्याच्या निमित्ताने बाहेरचे—मोजता न येण्याइतके लोक थेट कैद्यांच्या खोल्यांपर्यंत जा-ये करतात. ह्याच संधीचा आश्रफ आणि तिची एक सहकारी नहिद जलाल झादेह पळून जाण्याकरिता फायदा घेतात. बाहेरून आलेल्या अनेक बायांबरोबर त्यांच्यासारखेच कपडे घालून ह्या दोघी बाहेर पडतात; परंतु पहिल्या गेटच्या बाहेर पडल्याबरोबर नाहिदला पोलिस हटकतात व परत आत घेऊन जातात; पण आश्रफ मात्र निसटते आणि एखाद्या लोककथेतील सात सोप्यांप्रमाणे जेलचे तीन दरवाजे ओलांडून अश्रफ सरळ तुरुंगाच्या बाहेर पडते व आपल्या सहकाऱ्यांना जाऊन मिळते. तुरुंगात कैद्यांकडून घेतलेल्या जबानींचा काळ ७१-७२ सालातील आहे आणि आश्रफने १९७३ च्या मार्चमध्ये तुरुंगातून पलायन केले. म्हणजे त्या गोष्टीला आता ६—७ वर्षं झाली. ह्या ६—७ वर्षांत गनिमी दलांची शक्ती किती वाढली, लढ्यात उतरलेल्या इतर संघटनांशी त्यांचे संबंध असे आहेत, ह्याचा उलगडा मात्र ह्या पुस्तकात होत नाही, हे ह्या पुस्तकाचे एक वैगुण्यच म्हटले पाहिजे.

आज इराणमध्ये जो लढा सुरू आहे त्यात ह्या मार्क्सवादी गनिमी दलाबरोबरच राष्ट्रवाद्यांचा एक गट आणि धार्मिक पुनरुज्जीवनवाल्यांचाही एक गट आहे. नवे पंतप्रधान डॉ. बख्तिआर यांनी धार्मिक नेत्यांचा पाठिंबा आपल्याला मिळेल असे एका मुलाखतीत म्हटल्याचे प्रसिद्ध झाले आहे, तर सध्या इराणबाहेर असलेले एक धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी आपण लवकरच इराणात जाऊन राष्ट्रीय सरकार स्थापन करू, असे म्हणत आहेत. या सर्वांचे परस्पर संबंध काय राहणार व इराणमधील आगामी घटनांवर त्यांचे काय परिणाम घडून येणार यांवरही या क्रांतिकारक युवतीने काही भाष्य केलं असतं तर उपयुक्त झालं असतं.

—माधव लिमये

Torture and Resistance In Iran
Ashraf Dehgani
Printox publication.
A-10, Jungpura Extension,
New Delhi 110014
Price : Rs. 19/-.

□


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनानें आवर्जून प्रयत्न करावेत.
( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )
—डॉ. वा. ना. कुबेर

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये
राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

अमेरिकन साम्राज्यशाहीला हादरा देण्यात व्हिएटनामी स्त्रीचा मोठा वाटा होता.
इराणी स्त्री त्याच दिशेनें जाण्याचा प्रयत्न करत आहे.

# जीत हमारी होगी।

## लता भिसे

शहाचं देशाबाहेर जाणं आणि नव्या पंतप्रधानाची नेमणूक या दोन्ही घटनांनी इराणमधल्या जनआंदोलनाचा जोर ओसरलेला नाही. १९७१ नंतर जनआंदोलनाच्या लाटांवर लाटा इराणमध्ये येत राहिल्या. नव्या राजवटीमध्येही त्या ओसरतीलच याची खात्री देता येत नाही. या सर्व जनआंदोलनांचं, शहाच्या जुलमी राजवटीविरुद्ध चाललेल्या लढ्याचं एक प्रमुख वैशिष्ट्य असं आहे की, त्यामध्ये इराणमधल्या स्त्रियांचाही मोठा सहभाग आहे.

इराणच्या शहानं चळवळ दडपण्यासाठी विविध मार्गांचा वापर केला. रणगाडे, बंदुका, गुप्तहेरांचे जाळे, 'सावक'सारखी गुप्तहेर संघटना, आजन्म तुरुंगवासाची शिक्षा, अमानुष छळ, फाशी या कोणत्याही मार्गांनी इराणचा लोकशाही लढा दडपला गेला नाही. उलट दिवसेंदिवस तो तीव्रच झाला. वास्तविक इतकं प्रचंड दडपण असताना स्त्रिया यापासून लांब रहाण्याचीच शक्यता मोठी; परंतु रणगाडे आणि बंदुकांना इराणी स्त्री घाबरली नाही, उलट लढ्यातील तिच्या सहभागामुळे लोकशाही हक्कांच्या लढ्याला जोर आणि क्रांतिकारी संदर्भ प्राप्त झाला आहे.

कोणत्याही समाजाचे खरेखुरे चित्र पहायचे असेल तर त्या देशातल्या स्त्रियांची स्थिती पहाणं आवश्यक असते. इराणमध्ये शहाविरोधी वातावरण का झाले, सर्वसामान्य माणूस शारीरिक छळ, आजन्म तुरुंगवास, फाशी यांची भीती न बाळगता ही राजवट उलथून देण्याच्या लढ्यात सहभागी का झाला, याचे बरेचसे उत्तर इराणमधल्या स्त्रियांच्या स्थितीमध्ये सापडेल.

इराणमध्ये उद्योगधंद्यांची वाढ झाल्यानंतर तिथली स्त्री कामाच्या शोधात घराबाहेर पडली. स्त्री-कामगारांचा मोठा वर्गच तिथे तयार झाला; परंतु कोणत्याही कायद्याचे संरक्षण नाही, मागण्यांसाठी संप करण्याचा हक्क नाही अशा परिस्थितीत स्त्रियांचे प्रचंड शोषण चालू झाले. इराणमध्ये गालीचे तयार करण्याचा उद्योग मोठा आहे. हे गालिचे निर्यात करून त्यावर अफाट नफा मिळवला जातो. गालिचे तयार करण्याच्या उद्योगात स्त्री-कामगारांचे प्रमाण मोठे आहे. पण इथे अतिशय कमी मजुरीमध्ये या हजारो स्त्रिया काम करीत असतात. गालिचे तयार करण्याच्या जागा अतिशय कोंदट आहेत, हवा सुद्धा आत येऊ शकणार नाही अशा जागेत गालिच्यांचे विणकाम चालते. याचा गालिच्याच्या उद्योगातील स्त्रियांच्या आरोग्यावर अतिशय विघातक परिणाम होतो. अनेक स्त्रिया टी. बी. ला बळी पडलेल्या आहेत.

इराणमध्ये चहाचे मळेही मोठ्या प्रमाणावर आहेत. हलक्या हाताने चहाची पाने खुडण्याचे कसब स्त्रियाजवळच आहे. परिणामी चहाच्या उद्योगातही स्त्री-कामगारांचे प्रमाण मोठे आहे. या कामगारांतही लहान मुली आणि तरुण स्त्रियांचा भरणा जास्त आहे. ५ ते ८ वर्षे वयाच्या मुली अर्ध्या डॉलरवर काम करतात. अनेकदा खोटी कारणे दाखवून या अर्ध्या डॉलरमधला बराचसा भाग कापून घेतला जातो. चहाचे मळे, तंबाखू-उद्योग, भातशेती या तिन्ही ठिकाणी पुरुषांच्या निम्मी किंवा १/३ मजुरी स्त्रियांना मिळते. बेकारी मोठ्या प्रमाणावर असल्याने मिळेल त्या मजुरीवर काम करण्यास स्त्रिया तयार होतात. कापड उद्योगात तर स्त्रियांची परिस्थिती अतिशय भीषण आहे. १२ ते १८ वर्षे वयाच्या हजारो मुली या उद्योगात आहेत. त्यांना १२/१२ तास काम करावे लागते. इतर उद्योगातही स्त्रियांना सक्तीचे जादा काम करावे लागते. रात्रपाळीसुद्धा सक्तीची आणि आवश्यक मानली गेली आहे. औषध उद्योगामध्ये बहुसंख्य स्त्रिया निरक्षर आहेत. विधवा आहेत. त्यांना महिन्याला ४० डॉलर पगार मिळतो आणि त्यापैकी ५% पगार कापून घेतला जातो. कामगारांच्या भविष्यनिधीसाठी हा पैसा कापून घेतला जातो, असं सांगण्यात येतं; परंतु त्याचं पुढे काय होतं, हे कोणालाच माहिती नाही. या कामगार-स्त्रियांना आजारपणाच्या रजा नाहीत, आठवड्याची सुट्टीही बिनपगारी असते. इराणमध्ये शहरात जागा महाग आहेत, त्यामुळे बहुसंख्य स्त्रिया आजूबाजूच्या खेड्यांतच रहातात.

खेड्यातून शहराकडे यायचे म्हणजे दररोजचा भाडेखर्च आला. वाहनाची कोणतीही सोय कारखाने करत नाहीत आणि इराणमध्ये प्रवास अतिशय खर्चाचा आहे. बहुसंख्य कामगार-स्त्रियांच्या उत्पन्नाचा बराच भाग येण्या-जाण्यावर खर्च होतो. वाहनाची सोय तरी नियमित असावी, परंतु बसेसच्या अनियमित वेळामुळे अनेकदा कामावर यायला उशीर होतो. कामावर यायला उशीर झाला की पगार कापून घेतला गेलाच ! ज्या स्त्रिया शहरात राहतात, त्यांच्या घरांपेक्षा कबुतराची खुराडी बरी, असे म्हणण्याची वेळ येते. ५–५, ६–६ जणांची कुटुंबे १०×१० च्या खोलीत रहात असतात. या झोपडपट्ट्यांना पाण्याच्या पुरेशा सोयी नाहीत, सांडपाण्याची सोय नाही. त्यामुळे सर्वसाधारण आरोग्य कधीच चांगले नसते. आरोग्यविषयक सोयीही चांगल्या नाहीत. अतिशय अपुरे वेतन आणि वाढणाऱ्या किंमती याच्यामध्ये इराणी कामगार पिचून गेलेला आहे.

इराणच्या घटनेने बाळंतपणाची दीड महिन्याची रजा मंजूर केली आहे; परंतु कारखान्याचे मालक स्त्री बाळंत होण्यापूर्वी १५ दिवस आणि नंतर १५ दिवस रजा मंजूर करतात आणि या महिन्यासाठी एकूण पगाराच्या २/३ रक्कमच त्या स्त्रीला मिळते. स्त्री गर्भार राहिली की अनेक मालक तिला कामावरून काढून टाकतात. गर्भार स्त्रीसाठी कोणत्याच विशेष सोयी नाहीत. इराणमध्ये हॉस्पिटलची संख्या अतिशय कमी आहे आणि हॉस्पिटलमध्ये मॅटर्निटी वॉर्डही इतका लहान असतो की, स्त्रियांना शेजारणीच्या मदतीने अतिशय घाणेरड्या जागेत बाळंत व्हावे लागते. शिराझ या सात लाख लोकसंख्येच्या शहरात फक्त दोनशे स्त्रियांची सोय हॉस्पिटल करू शकते. तर मशहाद या साडेसात लाख लोकसंख्येच्या शहरातील रुग्णालयात स्त्रियांसाठी फक्त ११० कॉटस् आहेत.

इराणमधल्या ६०% स्त्रिया खेडेगावात रहातात. शेतीच्या कामाची बरीचशी जबाबदारी इराणी स्त्री उचलते. बहुसंख्य पुरुष एक तर शहरात कामाला जातात किंवा जमीनमालकाच्या शेतावर त्याला काम करावे लागते. ग्रामीण इराणी स्त्री रात्रीपर्यंत गालिचे विणत रहाते. कुटुंबाच्या उत्पन्नापैकी मोठा भाग इराणी स्त्री मिळवत असूनही तिला कोणतेही हक्क नाहीत. स्त्रिया कष्टाची कामे करत असल्याने बहुपत्नीत्वही अनेक ठिकाणी दिसून येते.

अतिशय मागासलेल्या कल्पना, रूढी, परंपरांना इराणी स्त्री बळी पडत असते. कुटुंबाच्या खानदानासाठी, इज्जतीसाठी नवरा केव्हाही बायकोला टाकून देऊ शकतो. नवरा किंवा वडिलांची परवानगी घेतल्याशिवाय स्त्री बाहेर जाऊ शकत नाही, देश सोडू शकत नाही. कायद्यामध्येही स्त्रियांना समान स्थान नाही. शिक्षण नाही आणि नोकरीही नाही; यामुळे कित्येक इराणी शेतकरी स्त्रिया वेश्याव्यवसायाकडे वळतात. अनेकदा त्यांना फसवून या व्यवसायाकडे वळवले जाते.

या आर्थिक, सांस्कृतिक गुलामीविरुद्ध स्त्रिया झगडू शकत नाहीत. कारण इराणमध्ये संघटनांना बंदी आहे. संप करायला बंदी आहे. इतक्या भीषण वास्तवात जगत असल्यामुळे लोकशाही लढ्यामध्ये लोकशाही हक्कांच्या मागण्यांच्या लढ्यात त्या उतरल्या नाहीत तरच नवल ! अमेरिकेन साम्राज्यशाहीविरोधी आणि शहाविरोधी लढ्यात या स्त्रिया सर्व बंधने झुगारून देऊन सहभागी झाल्या आहेत.

१९२३ मध्ये १२ तासांचे काम सक्तीने करायला लावलेल्या गालिच्यांच्या उद्योगातल्या स्त्रियांनी आणि मुलांनी संप केला होता आणि ८ तासांचा दिवस करून घेतला होता. ही अगदी जुनी घटना झाली; परंतु अगदी अलीकडे म्हणजे १९७६ मध्ये इराणने जेव्हा ओमानमध्ये सैनिक पाठवले तेव्हा त्यांचा पत्ता सैनिकांच्या कुटुंबियांना अनेक दिवस नव्हता. त्या सैनिकांचा ठावठिकाणा विचारण्यासाठी सैनिकांच्या आया-बहिणी, बायकांनी एकत्र येऊन प्रचंड निदर्शनं केली आणि इराणच्या ओमानमधील हस्तक्षेपाचा धिःकार केला !

१९७१ नंतर इराणच्या लोकशाही लढ्यातील स्त्रियांचा सहभाग खूपच वाढला. केवळ मोर्चामध्ये सहभागी होणे एवढ्या पुरताच तिचा वाटा मर्यादित नाही तर पत्रके तयार करणे, ती वाटणे आणि लढ्याच्या पूर्वतयारीमध्ये वैचारिक सहभागही आजची इराणी स्त्री देत आहे. एक लोकशाही हक्क नाकारली गेलेली सामान्य नागरिक म्हणूनच तिचं या लढ्यातलं अस्तित्व आहे. शहाच्या राजवटीत इराण मधल्या राजकीय स्त्री कैद्यांची संख्या ४००० होती. यावरून या स्त्रियांच्या प्रचंड सहभागाची कल्पना येऊ शकेल. रस्त्यावर येऊन गुंडांशी चार हात करण्यातही या स्त्रिया आता मागे नाहीत. सशस्त्र लढ्यासाठीही आज त्या तयार आहेत.

'सावक' या गुप्तहेर संघटनेने तर या स्त्री–क्रांतिकारकांना अमानुष पद्धतीने वागवून चळवळ चिरडण्याचा प्रयत्न केला. या क्रांतिकारी स्त्रियांचा तुरुंगात अमानुष शारीरिक छळ केला जातो. कोणताही खटला वा सुनावणी न होता या स्त्रियांना तुरुंगात ठेवले जाते. 'सावक' च्या गुंडांकडून तर या स्त्री-कैद्यांवर नित्य बलात्कार होत असतात. मारणे, विजेचे शॉक्स, सिगरेटचे चटके असा छळ तर सर्रास होतोच; परंतु लग्न झालेली, मुले असलेली, विशेषतः लहान मुले असलेली स्त्री जर राजकीय कैदी असेल तर तिच्या लहान मुलाचा अमानुष पद्धतीने तिच्यादेखत छळ करण्यात येतो, जेणेकरून तिने गुप्त माहिती सांगावी आणि चळवळ चिरडली जावी.

काही इराणी क्रांतिकारी स्त्रियांची माहिती त्यांच्या लढ्यावर जास्त प्रकाश टाकेल. इराणी लढ्याला मार्गदर्शन करणारी आणि अनेक क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान म्हणून जिचे वर्णन केले जाते ती फातिमा सईदी सध्या तेहरानच्या तुरुंगात आहे. तिला क्रांतिकारी वर्तुळात 'कॉम्रेड मदर' म्हणून ओळखले जाते. तिच्या मुलाचा शहाने बळी घेतल्यानंतर ती या लढ्यात सहभागी झाली. १९७३ मध्ये शहाच्या सैनिकांशी मुकाबला करीत असताना तिला पकडण्यात आलं. त्यानंतर तिचा इतका शारीरिक छळ करण्यात आला की सध्या तिचे दोन्हीही हात अर्धांगवायूने निकामी झालेत. अशाही अवस्थेत शहाचे सैनिक तिचा नित्य छळ करत असतात. दोन्ही हात कामातून गेलेली कॉम्रेड मदर तशाही अवस्थेत प्रतिकार करत असते. तिच्या या झुंजार प्रतिकाराने अनेकांना शहा विरुद्ध लढण्यास स्फूर्ति मिळाली आहे. मॅनिझ आश्रफ केरमानी ही इराणमधली पहिली क्रांतिकारी स्त्री की जिला तिच्या राजकीय कार्यासाठी गोळ्या घालून ठार करण्यात आलं. विदा हजेरी या ३६ वर्षांच्या समाजशास्त्रज्ञ स्त्रीची कथा निराळीच आहे १९७२ मध्ये इराणमधल्या गरीब लोकांचा तिने पाहणी केली आणि त्यावर एक प्रबंध लिहिला.

त्यामध्ये केवळ गरिबांच्या परिस्थितीचे वर्णन केले म्हणून तिला पकडण्यात आलं. अजूनही विदा तुरुंगातच आहे. सिमिन सहेली ही हुतात्मा झालेली दुसरी क्रांतिकारी स्त्री. शहा विरोधी कारवायांमध्ये भाग घेतला म्हणून २९ वर्षांच्या या डॉक्टर स्त्रीला पकडण्यात आलं आणि आश्रफ केरमानीबरोबरच गोळ्या घालून ठार केलं गेलं. शाहीन अवाकोली या केमिकल इंजिनिअर असलेल्या स्त्रीला ७१ साली अटक करण्यात आली तेव्हा तिचा मुलगा दोन वर्षांचा होता. तुरुंगात नेऊन तिच्यावर यथेच्छ बलात्कार करण्यात आला. तिच्या मुलाचा तिच्यादेखत छळ करण्यात आला. तिला मारहाणही केली गेली. जिच्याबद्दल लिहायलाच हवं अशी क्रांतिकारी स्त्री म्हणजे आश्रफ देहगानी. तिला अटक करून सतत शारीरिक छळ केला गेला. ही बाई २ वर्षे तुरुंगात राहिली आणि त्यानंतर एक दिवस ती तिथून पळाली. आजतागायत आश्रफला शहाचे 'सावक' एजंट पकडू शकले नाहीत. भूमिगत राहून ती लढ्याचे मार्गदर्शन करते आहे. आश्रफची तुरुंगातली डायरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. जेलर, कैद्यांना दिलेली वागणूक, तुरुंग यांचे वर्णन त्या डायरीमध्ये आहे. कैद्यांचे मन वळविण्यासाठी जेलर मुद्दाम कसे खोटं वागत, याबद्दलही आश्रफ लिहिते. कविमनाच्या आश्रफने या डायरीत बऱ्याच कविता दिल्या आहेत. तिच्याबरोबर तुरुंगात असलेल्या राजकीय कैद्यांबरोबर तिचा कवितेतून संवाद होई. या कविता त्यांना स्फूर्ती देत. या कवितांमधून एकमेकांना धीर, प्रेरणा दिली जाई. आश्रफने अत्यंत एकाकी अवस्थेत तुरुंगात दिवस काढले. त्याबद्दल ती म्हणते,

'कितीही तीव्र वेदना पटदिशी विसरून जाता येतात. जनता, जेलमध्ये आसपास असलेले कॉम्रेड्स्, जेलच्या बाहेर लढत असलेल्या कॉम्रेडस्च्या आठवणींमुळे या वेदना सहज सहन करता येतात. त्यांचं प्रेम तर कोणी थांबवू शकत नाही! शत्रूशी लढाई केवळ याच प्रेमाच्या जोरावर जारी ठेवता येते.

याच वेळी ती एक कविता उद्धृत करते–

'ऐ दुश्मन ! इन्सानियत के कातिल
हर कामरेड के मारे जाने पर
हर लडाकू की मौत पर
हम दोहराते है जनता ओर उसके दोस्तोंसे अपनी कस्मे !'

आश्रफच्या डायरीने अनेक तरुणांना शहाविरोधी लढ्यात अक्षरशः खेचलं.

इराणमध्ये साहित्यिक–कलावंतही मोठ्या प्रमाणावर शहाविरोधी लढ्यामध्ये उतरले. यामध्येही स्त्री–साहित्यिक, कवयित्री अर्थातच आघाडीवर आहेत. आपल्या कवितांमधून क्रांतीचा संदेश देणारी मार्जी ओस्कूई तर सशस्त्र लढ्यात सहभागी झाली आणि शहाच्या गोळ्या खात हुतात्मा झाली !

कामगार स्त्रिया, सुशिक्षित स्त्रिया या लढ्यात सर्वार्थाने सहभागी झाल्या आहेत. इराणमधील शहाविरोधी वातावरण घराघरात पोहोचलं आहे, त्याची ही निशाणी आहे. स्त्रीच्या गुलामीला कारण असलेल्या शहाची राजवट उलथवण्यासाठी आणि तिला समान स्थान देणाऱ्या समाजरचनेची निर्मिती करण्यासाठी होणाऱ्या लढ्यात इराणी स्त्री मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहे. अमेरिकन साम्राज्यशाहीला हादरा बसविण्यात व्हिएटनामी स्त्रीचा हातभार मोठा होता. इराणी स्त्रीही त्याच दिशेने जाण्याचा प्रयत्न करत आहे.

स्त्री म्हणून असणारी सर्व सामाजिक बंधने झुगारून देऊन शहाच्या बंदुका आणि रणगाड्यांना टक्कर देत हुकुमशाहीचा पाडाव करायला इराणी स्त्री निघाली आहे. समाजवादी इराण उभा करण्यात या स्त्रियांचा नक्कीच मोठा वाटा रहाणार आहे. शोषणविरहित समाजरचनेसाठी जगभर जिथे जिथे लढे चालले आहेत ह्या सर्व देशांत लढवय्या इराणी स्त्रिया आज स्फूर्ती देत आहेत. □

---

## मी अशी एक स्त्री आहे !

मी आई आहे,
मी बहीण आहे,
मी विश्वासू पत्नी आहे,
मी एक स्त्री आहे.

अशी स्त्री की जी सुरुवातीपासूनच,
अनवाणी पायांनी,
वाळवंटातील तापलेल्या वाळूवरून
धावते आहे.

उत्तरेकडील लहान लहान खेड्यांमधून
आलेली मी अशी एक स्त्री आहे,
की जिने शक्तीच्या शेवटच्या थेंबापर्यंत
भाताच्या शेतात आणि चहाच्या मळ्यात
काम केलं आहे.

पूर्वेकडील उद्ध्वस्त प्रदेशातून मी
आले आहे.
तापलेल्या धरतीची तृष्णा मी
अनुभवली आहे.

मी अशी एक स्त्री आहे
की जिने सकाळपासून संध्याकाळपर्यंत
गुरं चरायला नेत असताना,
त्यांच्याबरोबर राना-वनात फिरत असताना
वेदनेचं ओझं अनुभवलं आहे.

पठारांवर आणि डोंगर-दऱ्यांमध्ये
भटकणाऱ्या भटक्या जमातीमधली मी
एक स्त्री आहे की जी,
पर्वतांच्या कुशीतच आपल्या बाळाला
जन्म देते.

मी एक स्त्री आहे,
मी एक कामगार आहे,
की जिचे हात कारखान्यातील
अवजड यंत्रं फिरवण्यात
गुंतलेले आहेत.
दर दिवसागणिक ही यंत्रं
माझ्यातील शक्ती त्यांच्या चाकांच्या
दात्यांमध्ये धरून, माझ्या डोळ्यांदेखत
ओरबाडून घेतायत्.
माझ्या सांडणाऱ्या रक्तामधूनच
भांडवलदारांचा नफा वाढतो आहे.

मी अशी एक आहे,
की जिची महती सांगू शकेल
असा एकही शब्द तुमच्या
शब्दसंग्रहात नाही.
तुमचा लाजिरवाणा शब्दसंग्रह
फक्त 'मादी' जाणतो,
की जिचे हात स्वच्छ आहेत,
जिचं शरीर सहज झुकतं,
जिची कांती मऊ आहे आणि
जिच्या केसांना सुगंध आहे.

वेदनांच्या जखमांनी हात झाकाळून गेलेली
मी एक स्त्री आहे.
तुमच्या निर्लज्ज,
पाठीचा कणा मोडून काढणाऱ्या
अमर्याद कामामुळे शरीरच उन्मळून पडलेली
मी एक स्त्री आहे.

मी अशी एक स्त्री आहे,
की जिची कातडी म्हणजे वाळवंटातील सूर्याचा
आरसा बनली आहे आणि जिच्या केसांना,
फॅक्टरीतल्या धुराचा वास आहे.

मी एक स्वतंत्र स्त्री आहे.
कॉम्रेडस्‌बरोबर, माझ्या भावांबरोबर
खांद्याला खांदा लावून,
मी मैलोन्‌मैल चालले आहे

शेतकऱ्यांचे आणि
कामगारांचे बाहू बळकट करणारी
मी स्त्री आहे.
मी स्वतःही एक कामगार आहे.
मी स्वतःच एक शेतकरी आहे.

माझं सबंध शरीर वेदनांनी
ग्रासलं आहे,
माझ्या रोमारोमात तिरस्कार भरला आहे.
माझी क्षुधा म्हणजे मृगजळ आहे
आणि माझी नग्नता म्हणजे केवळ
एक स्वप्न आहे, असं म्हणणारे तुम्ही
बेशरम आहात !

मी स्त्री आहे,
अशी एक स्त्री की जिची महती पटवणारा,
एकही शब्द तुमच्या शब्दसंग्रहात नाही.
माझ्या उरोजांमागील हृदय
संतापाने व्यापलं आहे,
माझ्या डोळ्यांमध्ये स्वातंत्र्याच्या
संगिनींचं प्रतिबिंब पडलं आहे.
मी अशी एक स्त्री आहे
की जिला बंदूक उचलणंसुद्धा
माहित झालं आहे !!

—मार्जी ओस्कूई

(अनु.—सतीश कामत)

धुडकावून लावल्या. संतापलेल्या मोझादेकनं राजीनामा देऊन टाकला. मोझादेकच्या जागी क्वावाम या वृद्ध राजकारण्याची नेमणूक करण्यात आली; पण तो ब्रिटिशांचा हस्तक समजला जात असे. त्यामुळे सामान्य जनतेत क्वावामबद्दल आदर नव्हता. त्यामुळे शहाला पुन्हा मोझादेकचेच पाय धरावे लागले. त्याच्या आधी धुडकावलेल्या मागण्या शहाला मान्य कराव्या लागल्या आणि मोझादेकच्या हाती सत्तेची सूत्रं गेली. लगोलग मोझादेकने सिनेट आणि न्यायालयाचे अधिकार रद्दबातल ठरवले. मंत्रिमंडळातल्या आणि लष्करातील महत्त्वाच्या जागांवर त्याचेच अनुयायी नेमले जाऊ लागले. मोझादेकनं सबंध देशात मार्शल लॉ पुकारला. ◻

१३ ऑगस्ट १९५३ रोजी शहाने एक फतवा काढला. त्यानुसार मोहम्मद मोझादेकला काढून टाकण्यात आलं होतं आणि त्याच्या जागी जनरल फाझलोल्लाह जहेदी याची पंतप्रधान म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याचप्रमाणे कर्नल नेमातुल्ला नासिरीची राजसेनेचा कमांडर म्हणून नेमणूक करण्यात आली. या काळात शहाने आपला मुक्कामही माझान्देरन मधील केलारदश्त इथे हालवला होता. अर्थात तो तेहरानमधील राजवाड्याशी सतत संपर्क साधून होताच. देश सोडण्याच्या तयारीत असलेला शहा दोन रात्री झोपलादेखील नाही !

१६ ऑगस्ट रोजी मोझादेकच्या अनुयायांनी रेडिओवरून असे जाहीर केलं की, कर्नल नासिरीला अटक करण्यात आली असून त्याची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे.

ही बातमी ऐकल्यावर लगेचच शहा त्याच्या सोरया या पत्नी-बरोबर एक इंजिन असलेल्या विमानात बसून देशातून बाहेर पडला आणि बगदादला गेला. लगेच मोझादेकने इराणमध्ये पहलवी राज-सत्ता संपुष्टात आल्याचं जाहीर करून टाकलं.

परंतु मोझादेक हे स्थान टिकवू शकला नाही. कारण नेमकं याच वेळी तुदेह पक्षाच्या नेत्यांनी त्याला दगा दिला. ते मोझादेकवर आणि त्याच्या नॅशनल फ्रंटवर टीकेचा भडीमार करू लागले. त्याच-प्रमाणे मध्यम वर्गीय आणि शेतकरी-कामगार या दोघांनाही बरोबर घेऊन जाऊ शकेल असं नेतृत्व या दोन्ही पक्षांकडे नव्हतं. त्यामुळे जनतेचाही पुरेसा पाठिंबा मिळू शकला नाही. त्यामुळे तीनच दिवसांनी म्हणजे १९ ऑगस्ट रोजी दुपारपर्यंत मोझादेकचाच उचल-बांगडी झाली आणि शहा पुन्हा सत्तेवर आला. शहाची सिंहासनावर ही पुनर्स्थापना करण्यात अमेरिकेच्या C. I. A. या गुप्तहेर संघट-नेचा मोठा हात होता, असा आरोप शहाच्या विरोधकांकडून अजूनही केला जातो.

२२ ऑगस्ट १९५३ रोजी पुन्हा सत्ता मिळवणाऱ्या शहाला १६ जानेवारी १९७९ रोजी पुन्हा देश सोडून जावं लागलं; पण या मधल्या पंचवीस वर्षांच्या काळात त्याने इराणमध्ये भरपूरच उलथापालथ केली.

१९५३ साली सत्तेवर आल्यानंतर शहाने एक सहा कलमी कार्यक्रम जाहीर केला. ती कलमं पुढीलप्रमाणे –

१. भूमिहीनांना जमिनी देणे आणि जमीनदार व शेतमजूर यांच्यातील संबंधांचं स्वरूप पूर्णतः बदलून टाकणे.

२. कामगाराला त्याच्या श्रमांचा योग्य मोबदला मिळावा म्हणून उद्योगधंद्यातील कामगार-मालक-संबंधांची पुनर्रचना.

३. सामान्य माणसाला स्वतःच्या हक्कांची जाणीव व्हावी, तसंच अन्यायाविरुद्ध आवाज उठवता यावा म्हणून साक्षरता-प्रसार.

४. सर्वत्र परिणामकारक आरोग्यव्यवस्था.

५. ग्रामीण भागातील मागासलेपण नष्ट करणे.

६. लोकशाही राज्यव्यवस्थेची पुनर्रचना आणि स्त्रियांना समान-हक्क.

शहाने दिलेला हा सहा कलमी कार्यक्रम निश्चितच आशादायी होता. तसे कार्यक्रम कुठलेच वाईट नसतात. मग ते पाच कलमी असोत, वीस कलमी असोत किंवा पंचवीस कलमी असोत. त्यांची अंमलबजावणी होते की नाही, आणि झाली तर कशी होते हे महत्त्वाचं असतं. शहाच्या अमदानीतही हेच घडलं. त्याने कार्यक्रम झकास ठोकून दिला; पण त्याची कृती मात्र उलटयाच दिशेनं होत राहिली.

शहाने शेतीविषयक प्रश्नामध्ये लक्ष घालण्याचं आश्वासन दिलं. केनेडींच्या मदतीने जमीन सुधारणेचा कार्यक्रमही दिला; पण 'तेहरान एकॉनॉमिस्ट' या इराणच्या सरकारी मासिकातीलच आकडेवारीनुसार जमीनसुधारणेचा कार्यक्रम लागू करून एक दशक उलटलं तरी ( प्रगतीचं दशक ? ) कृषिक्षेत्रातील इराणची प्रगती सुधारली तर नाहीच, उलट ती आणखीनच खालावली. गव्हाचं उत्पादन १३ टक्क्यांनी, बार्लीचं १७ टक्क्यांनी, तेलबियांचं १२·४ टक्क्यांनी, तर चहाचं उत्पादन १८·४ टक्क्यांनी घसरलं. यामुळे शेतकऱ्यांमध्ये एक प्रकारचं नैराश्याचं वातावरण पसरलं आणि बेकारी, रोगराई, उपासमार ही शहरातील कामगारांची दुःखं त्यांच्याही वाट्याला आली.

शहरांमध्ये इतका प्रचंड आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला आहे की मालक-कामगार-संबंध सुधारणं तर बाजूलाच राहो, पण कारखाने एकामागून एक बंदच पडायला लागले आणि एकट्या हमेदाम या शहरातच पन्नास टक्क्यांहून जास्त कामगार बेकार झाले आहेत. अशाच तऱ्हेचा आर्थिक पेचप्रसंग १९५९ ते १९६३ या काळात निर्माण झाला होता; पण लष्कर, पोलीस आणि १९५७ सालीच निर्माण झालेल्या 'सावक' या सरकारी गुप्तहेर संघटनेच्या बळावर शहाने तो असंतोष दडपून टाकला होता. ५ जून १९६३ रोजी एका

मोझादेकचं सरकार सत्तेवर आल्याबरोबर सरकारी ऑफिसं, सिनेमागृहं, दुकानं इत्यादी सर्व सार्वजनिक आणि खाजगी ठिकाणी लावलेले शहाचे फोटो काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला. तसंच लष्करातील सकाळ–संध्या-काळच्या प्रार्थनेतही शहाचं नाव घेण्यास बंदी करण्यात आली. ◻

१५ हजारांच्या मोर्च्यावर अमानुष गोळीबार करण्यात आला आणि सर्वत्र शांत शांत झालं.

साक्षरता प्रसाराच्या बाबतीतही शहाने फारसं लक्ष घातलं नाही. आजही इराणमध्ये निरक्षर स्त्रियांचं प्रमाण ८० टक्के आहे आणि सामान्य जनतेच्या हक्कांबाबत तर काय बोलावं ? राजेशाहीमध्ये हक्क राजाला असतात, पामर जनतेने फक्त फलाची अपेक्षा न धरता कर्म करत राह्यचं असतं !

नागरिकांच्या आरोग्यासाठीही शहाने विशेष प्रयत्न केले नाहीत. वाढत्या औद्योगिक क्षेत्राबरोबर निर्माण होणारे आरोग्यविषयक प्रश्न त्याच्या राजप्रासादापर्यन्त कधी पोहोचूच शकले नाहीत. साडेसात लाख वस्तीच्या शहरात बाळंतपणासाठी फक्त ११० कॉटस्ची सोय असावी, हे चित्र काय दाखवतं ?

लोकशाही राज्यव्यवस्थेची पुनर्रचना म्हणजे शहाला नेमकं काय अभिप्रेत होतं हे आजतागायत कोणालाच कळलेलं नाही. अर्थात शहानेही फार गंभीरपणे हे म्हटलं नसेल. कारण त्याच्या मते, लोकांवर शाही म्हणजे लोकशाही असणार.

तेलकंपनीचं राष्ट्रीयीकरण करण्याचा आग्रह धरताना डॉ. मोझादेक म्हणाला होता की, याच्या नफ्यामधून मी संपूर्ण देश संपन्न करून दाखवीन. आजही इराणला तेल-उद्योगातून २२ अब्ज डॉलर्स इतका फायदा होतो; पण हा सगळा पैसा जातो कुठे ? ५ मार्च १९७५ च्या ' द न्यूयॉर्क टाइम्स 'च्या अंकात आलेली पुढील बातमी पहा –

' वॉशिंग्टन, ४ मार्च – आजच इराणने अमेरिकेबरोबर एक महत्त्वाचा आर्थिक करार केलेला आहे. या करारानुसार पुढील पाच वर्षांत अमेरिकन उत्पादने आणि सेवा यांवर इराण १५ अब्ज डॉलर्स खर्च करील. त्याचप्रमाणे पुढील दशकामध्ये मोठ्या आठ अणुशक्ति केंद्रांसाठी-७ अब्ज डॉलर्स खर्च करण्याचे इराणने तत्त्वत: मान्य केले आहे.'

१९७३ साली निक्सनच्या अमदानीतही, अमेरिकेच्या ४.१७ अब्ज डॉलर्सच्या शस्त्रास्त्र विक्रीपैकी २.१ अब्ज डॉलर्सची शस्त्रास्त्र एकट्या इराणकडे गेली होती.

देशामध्ये निकृष्ट आहार आणि उपासमारीचे बळी पडत असताना शस्त्रास्त्र खरेदीसाठी शहा ४ अब्ज डॉलर्स खर्च करत होता. देशातील बालमृत्यूंचं प्रमाण ५० टक्क्यांहून जास्त असताना शहा इंग्लंडला २.२ अब्ज डॉलर्स, फ्रान्स आणि इजिप्तला १.१ अब्ज डॉलर्स आणि भारताला ३० कोटी डॉलर्स वाटत होता. देशातील अनेक छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांचं आर्थिक मंदीमुळे दिवाळं वाजत असताना पॅन अमेरिकन एअरलाइन्स, टी. डब्ल्यू. ए., जर्मन एअर क्राफ्ट, लॉकहीड, बेयर ऑफ जर्मनी, क्रूप इंडस्ट्रीज यासारख्या परदेशी विमानकंपन्यांचं दिवाळं वाजू नये म्हणून शहा त्यांच्याकडून त्या पाठवतील तेवढी विमानं खरेदी करत होता. थोडक्यात, शहा पाश्चिमात्य राष्ट्रांना देश विकत होता. इराण देश, या देशातील जनता, या देशाचं हित, या जनतेचं हित यापेक्षाही शहाला स्वत:चं हित आणि स्वत:ची प्रतिष्ठा अधिक महत्त्वाची वाटत होती. १९५३ ते १९७८ या काळातला इराणचा इतिहास हा इराणी जनतेच्या कर्तृत्वापेक्षाही शहेनशहाच्या नीच नाकर्तेपणाने भरलेला इतिहास आहे. □

---

योगायोग असा की, या शहाचा पिता–रेझा शहा याने एकदा मोझादेकला पकडून दीर्घ मुदतीची शिक्षा केली होती; पण या शहानेच आपल्या पित्याजवळ मोझादेकसाठी रदबदली करून त्याची शिक्षा कमी करून घेतली होती आणि हाच मोझादेक आता शहाला देश सोडून जायला कारणीभूत झाला होता ! □

---

आज मयूरसिंहासन रिकामं पडलंय; पण त्याच्यावर पुन्हा कोणी बसणारच नाही, याची हमी देणं कठीण आहे. १९५३ सालाप्रमाणेच आताही खुद्द शहाच वातावरण थोडेसं निवळल्यावर अमेरिकेच्या मदतीनं पुन्हा या सिंहासनावर विराजमान होईल किंवा त्याचाच वारस सांगून दुसरे कोणी येईल; पण राजसत्तेचा अडीच हजार वर्षांचा इतिहास असलेल्या इराणचं मयूरसिंहासन कायमचं रिकामं पडणार नाही ! तिथल्या जनतेलाच ते रुचणार नाही, पचणारही नाही. आज तरी इराणची अवस्था

Hanging between the two worlds,
One dead, other powerless to be born

अशीच आहे. □


**तीन राजहंस प्रकाशने**

**आणि ड्रॅगन जागा झाला !**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : मद्रा रुपये

राजहंस प्रकाशन पुणे
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

# इराणला स्थैर्य आम्हीच देऊ शकू !

## इराणी मार्क्सिस्ट तरुणाची मुलाखत

### सतीश कामत

कोणत्याही देशात तरुणच क्रांती घडवून आणू शकतात. देशातील बुद्धिजीवी वर्ग आणि कामगार या दोघांनाही बरोबर घेऊन जाऊ शकणारा तरुण वर्ग ज्या देशात असतो त्या देशात क्रांती घडून यायला वेळ लागत नाही. भारतामध्ये आणीबाणीच्या काळात जो अनुभव आला तोच अनुभव आता इराणमध्ये आला आहे. एखादा वृद्ध नेता फक्त सूत्रं हलवू शकतो; पण प्रत्यक्ष क्रांती तरुणांकडूनच घडवून आणता येते. ज्याप्रमाणे आणीबाणीच्या काळात भारताबाहेरील देशांमध्ये आणीबाणीविरोधी प्रचार करणाऱ्या आणि त्या काळातील हुकूमशाहीचे बुरखे फाडणाऱ्या संघटना निर्माण झाल्या, तशाच संघटना इराणमध्ये शहाविरोधी आंदोलन चालू झाल्यावर निर्माण झाल्या. भारतामध्येही अशा इराणी विद्यार्थ्यांच्या दोन संघटना आहेत. त्यातील एक इस्लामिक आहे आणि एक मार्क्सिस्ट आहे. यातील मार्क्सिस्ट संघटनेच्या तरुणांशी बोलताना शहाच्या राजवटीविषयी आणि शहाविरोधी आंदोलनाविषयी पुष्कळच नवीन माहिती मिळाली. पुण्यामध्ये पत्रकं वाटणे, पोस्टर्स लावणे, शहाविरोधी शक्य त्या सर्व मार्गांनी प्रचार करणे, निदर्शने करणे असे विविध उपक्रम ही संघटना शहा इराण सोडून जाईपर्यंत करत होती. या संघटनेतीलच काही तरुणांनी इराणमधल्या शहाच्या राजवटीसंबंधी आणि नंतरच्या पेचप्रसंगाविषयी व्यक्त केलेले विचार चिंतनीय आहेत.

'इराणमधील सद्यःस्थितीचा जर योग्य अन्वय लावायचा असेल तर आपल्याला सुमारे पंधरा ते वीस वर्षं मागे जाऊन इराणमधील तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा विचार केला पाहिजे.' संघटनेतला एक तरुण सांगू लागला. 'त्या वेळी इराणमध्ये वसाहतवाद आणि सरंजामशाही दोन्हीही अस्तित्वात होतं. प्रथम इराणवर ब्रिटनची पकड होती. त्याची जागा नंतर अमेरिकेनं घेतली; परंतु इराणच्या सामाजिक परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. जॉन केनेडी या त्या काळातील अमेरिकन अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली शहाने इराणमध्येही 'श्वेतक्रांती'ची घोषणा केली. जमीन सुधारणेच्या दिशेनं नवी पावलं टाकत असल्याचं सबंध देशाला ओरडून सांगितलं; पण श्वेतक्रांतीची किंवा जमीन-सुधारणेची कटु फळंच गरीब शेतकऱ्याला चाखायला मिळाली. कारण देशातील जमिनीचं वाटप करताना गरीब शेतकऱ्याला किंवा भूमिहीनांना त्यामध्ये काहीच स्थान नव्हतं. इराणमधील उच्च मध्यमवर्गीय आणि श्रीमंत वर्ग, तसंच पाश्चिमात्य राष्ट्रांमधील बड्या कंपन्या यांच्यातच त्या वाटल्या गेल्या. यामुळे सरंजामशाहीला अधिकच वाव मिळाला. तसंच पाश्चिमात्य राष्ट्रांतील बड्या कंपन्यांचा शिरकाव इराणमधील शहरांप्रमाणेच आता खेड्यांमध्येही झाला.

त्यामुळे इराणमधील आजच्या असंतोषाची मुळं १९६० ते १९६५ या काळात सापडतात. आता तर परिस्थिती आणखीच बिकट झाली होती. कारण इराणमध्ये कामगार संघटना, राजकीय पक्ष, वृत्तपत्र-स्वातंत्र्य या सर्वांवर शहानं बंदी घातली होती. 'आम्ही उपाशी मरत आहोत,' हेसुद्धा ओरडून सांगण्याचं स्वातंत्र्य आता शहानं ठेवलं नव्हतं.

'पाश्चिमात्य राष्ट्रांमधील बड्या कंपन्यांना इराणमध्ये मन मानेल तसा शिरकाव करू देण्याच्या, त्यांच्यावर कोणतीही कडक बंधनं न घालण्याच्या शहाच्या धोरणामुळे इराणमधील आजची परिस्थिती अशी आहे की, इथं बाहेरून कंपन्या येतात. इराणी जनतेचा ते अतिशय स्वस्त दरानं कामगार म्हणून वापर करतात आणि आपली उत्पादनं Made in Iran अशी लेबल्स लावून बाहेरच्या जगात खपवतात. त्यावर भरमसाट नफा मिळवतात की जो पुन्हा त्यांच्याच देशाच्या तिजोरीत जमा होतो आणि या कंपन्यांच्या व्यवहारामध्ये किंवा व्यवस्थापनामध्ये शहालादेखील हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. या सगळ्यामुळे इराणी जनतेचं स्थान ओझी वाहणाऱ्या गाढवापेक्षा वरचं राहिलं नाही. इराणमधील अमेरिकन सल्लागारांची संख्याच आज चाळीस हजारांच्या घरात जाते. इराणमध्ये शहाविरोधी आंदोलन निर्माण व्हायला शहाचे हे औद्योगिक धोरण फार मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. इराणमध्ये औद्योगिक वाढ प्रचंड होऊनही त्यातून निर्माण होणारा पैसा परदेशांत जातो आणि इराणी जनतेच्या नाकात फक्त धूर जातो.

'याची सर्वांत जास्त झळ साहजिकच इराणी कामगाराला पोचली; पण इथल्या कामगारांमध्ये परिस्थितीचं भान अद्यापही फार कमी आहे.

'त्यामुळे प्रथम या कामगाराला जागं करण्याचं काम इराणमधील डाव्या विचारसरणीच्या संघटनांनी सुरू केलं; पण इराणमध्ये विचारसरणी डाव्या बाजूला झुकणारी असणं, हेच शहाने बेकायदेशीर ठरवलं होतं आणि त्याबद्दल तीन ते दहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षाही होत असे. त्यामुळेच पुढे

पुढे इराणमधील तरुणांमध्ये असा विचार बळावायला लागला की, शस्त्राला उत्तर शस्त्रानेच द्यावं लागतं. म्हणूनच आमच्या विद्यार्थी संघटनांचा जो emblem आहे त्यामध्ये दाखवलेल्या हातात आता विळा–कोयता नाही, तर मशिनगन आहे; कारण केवळ इराणमध्येच नव्हे तर जगाच्या पाठीवर जिथे जिथे म्हणून राष्ट्रीय चळवळ चालू असेल त्या सर्व चळवळी दडपण्यासाठी शहाने तिथल्या सत्ताधीशांना मदत केलेली आहे. इस्रायल, सोमालिया, दक्षिण आफ्रिका ही त्यापैकीच काही राष्ट्रे !

' इराणमधील गेल्या चार वर्षांतील inflation ही लक्षणीय आहे. १९७३ साली ते ३१% होतं, ७५ साली ३९·५%, ७७ साली ४१%, तर गेल्या वर्षी ५१% वर ते जाऊन पोचलं आहे. आज इराणमध्ये कांदेसुद्धा तुमच्या भारतातून निर्यात करावे लागतात आणि मटण ऑस्ट्रेलियाहून आयात करावं लागतं. त्यामुळे डबाबंद मटणाच्या एक किलोला आज ३५ रु. मोजावे लागतात आणि शहरात जर एखादी लहानशीच खोली हवी असली तरी किमान ५०० रु. भाडं द्यावं लागतं. पेट्रोलच्या उत्पादनातून मिळणारा पैसा शहाने देशामध्ये सुधारणा करण्यासाठी, इराणी जनतेचं जीवनमान उंचावण्यासाठी वापरण्याऐवजी जगातील इतर देशांना कर्ज वाटण्यात घालवला. यामुळे देशात मात्र श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावतच गेली. शहाने इराणमध्ये आणलेली पाश्चिमात्य संस्कृतीही इराणी जनतेला गुदमरून टाकणारी होती. इथल्या जनतेने ती स्वखुशीने कधीच स्वीकारली नाही. तिच्यावर ती लादली गेली.

' शहाच्या या सर्व देशविघातक कृत्यांबद्दल निषेधाची आणि संतापाची लाट प्रथम ' पेटी बूर्ज्वा ' वर्गामध्ये उमटली आणि इस्लामिक संघटनेच्या बॅनरखाली त्यांनी चळवळ सुरू केली. संघटना धार्मिक असल्याने शहा ही चळवळ दडपू शकला नाही; कारण इराणमध्ये अजूनही धर्मांधता फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्यातच शहाने शहरांमधील विजेच्या आणि पाण्याच्या वापरावर कडक निर्बंध घातले. ज्यांच्याकडून ते उल्लंघिले जातील त्यांची कनेक्शन्सच तोडण्यात येऊ लागली. ' झोपडपट्टी हटाव ' हाही एक नवीन कार्यक्रम शहाने हाती घेतला. त्यामुळे मग मार्क्सिस्ट विचारप्रणालीच्या इराणमधील संघटनांच्या मार्गदर्शनाखाली या झोपडपट्टीवासियांनी उग्र आंदोलनाला सुरुवात केली.

' १९७७ च्या ऑक्टोबरमध्ये सईद सुल्तानपूर या प्रसिद्ध राजकीय कवीचं तेहरान विद्यापीठामध्ये भाषण होतं. पोलिसांनी फक्त सात हजार लोकांना प्रवेश द्यायचं ठरवलं होतं; पण प्रत्यक्षात पंचवीस हजारांचा जमाव जमला. पोलिसांनी जमाव पांगवण्यासाठी बेदरकारपणे गोळीबार केला. कित्येक जण मारले गेले. जे जिवंत राहिले त्यांनी आपापल्या शहरांत जाऊन उग्र आंदोलनाला सुरुवात केली. अशाच तऱ्हेचं एक मोठं निदर्शन क्वूम या प्रसिद्ध धार्मिक शहरात झालं. निदर्शकांवरही गोळीबार झाले. त्यात किमान एक हजार लोक मारले गेले. याहीपेक्षा भयंकर गोष्ट म्हणजे छळवणुकीचं प्रशिक्षण घेण्यासाठी काही खास तुकड्या शहाने ब्राझील आणि पनामाला पाठवल्या होत्या आणि त्याचे प्रयोग तुरुंगातील राजकीय कैद्यांवर केले गेले.

' पण यासारख्या घटनांमुळे शहा-विरोधी आंदोलन चिरडलं जाण्याऐवजी त्याला खतपाणीच मिळालं आज इराणमध्ये इराणी डॉक्टर्स किंवा इंजिनिअर्स नाहीत, अशी परिस्थिती नाही; पण जे आहेत त्यांपैकी बहुसंख्य तुरुंगात खितपत पडले आहेत. इराणबाहेर असणाऱ्या इराणी डॉक्टर्स–इंजिनिअर्सची संख्या आज वीस हजाराच्यांवर आहे. पण इराणमधल्या शहाच्या जुलमी राजवटीमुळे आणि अस्थिर परिस्थितीमुळे ते इराणमध्ये यायलाच तयार नाहीत. इराणच्या लोकसंख्येच्या तुलनेत त्यांची संख्या कमी आहे; पण त्याला शहाचंच धोरण कारणीभूत आहे. आज शालेय शिक्षण संपवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी फक्त १० टक्के विद्यार्थ्यांना विद्यापीठामध्ये प्रवेश मिळतो.

' त्यामुळे शहाविरोधी झालेलं हे आंदोलन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा चारही आघाड्यांवर लढलं गेलं. जोपर्यंत शहा सत्तेवर होता तोपर्यंत फारसं कठीण नव्हतं. कारण असंतोष व्यक्त करायला एक निश्चित channel होता. प्रत्येकासमोर एक निश्चित ध्येय होतं, उद्दिष्ट होतं. आमची खरी कसोटी इथून पुढेच आहे. कारण खोमेनी हा जरी धार्मिक नेता असला आणि त्यामुळे त्याला जनतेचा भरपूर पाठिंबा असला तरी मुत्सद्दी व राजकारणी म्हणून तो कितपत यशस्वी ठरेल, याविषयी आम्हाला शंका आहे. कारण नुसत्या धार्मिकतेच्या जोरावर राष्ट्र संपन्न करता येत नाही. त्यामुळे नॅशनल फ्रंट या पक्षाचाच कोणी तरी नेता इस्लामिक आणि मार्क्सिस्ट या दोन्ही संघटनांना एकत्र ठेवू शकेल; पण अमेरिका सध्या ही नॅशनल फ्रंटच फोडण्याचा प्रयत्न करत आहे. सध्या शहाने नियुक्त केलेले पंतप्रधान शापूर बख्तियार याला नॅशनल फ्रंटच्या ' इराण पार्टी ' या गटाचा, तर संजाबी या दुसऱ्या प्रसिद्ध नेत्याला ' न्यू इराण पार्टी ' या गटाचा नेता करण्यात आलं आहे. त्यापैकी शापूर बख्तियारचा गट उजवीकडे झुकणारा आहे, तर संजाबीचा गट जास्त radical आहे. शापूर बक्तियारचं शिक्षण फ्रान्समध्ये झालं. फ्रान्सच्या लष्करातही त्याने काही काळ नोकरी केली. त्यामुळे त्याची वृत्ती पाश्चिमात्य संस्कृती शिरोधार्य मानणारी आहे. त्याचप्रमाणे बख्तियारचा कम्युनिझमद्वेषही जगजाहीर आहे. त्यामुळे त्याला नॅशनल फ्रंट या पक्षातून काढूनही टाकण्यात आलं. ही नॅशनल फ्रंट मात्र तुमच्या जनता पार्टीसारखीच आहे. नव्या नेत्याच्या संदर्भातच शरीआह मदारी या नेत्याचाही विचार सध्या होतोय; पण त्याच्याबद्दल इराणी जनतेलाच पुरेसा विश्वास नाही. कारण त्याच्यामध्ये संधिसाधूपणाची वृत्ती बऱ्याच वेळा दिसते.

' समाजातील खालच्या थरातूनही आम्हाला चांगला पाठिंबा मिळू लागला आहे. अर्थात आम्ही जर सत्तेवर आलो तर चीन किंवा रशियाची पकड इराणच्या कारभारावर पडेल अशी भीती बाळगण्याचं कारण नाही. कारण त्यांच्याबरोबर केवळ समान मैत्रीचे संबंध ठेवण्याचं धोरण आम्हाला स्वीकारता येईल. देशातील बुद्धिजीवी वर्गही आज श्रमिक संघटना mobilise करण्याच्या दृष्टीने कामाला लागलेला आहे. अशा किमान पंधरा संघटनांचा आम्हाला पाठिंबा मिळालेला आहे. त्यामुळेच आता लगेच नाही, तरी नजिकच्या भविष्यकाळात आम्हाला राज्यकारभाराची संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात या सगळ्याचा

अर्थ आम्हाला राजेशाही मान्य नाही असा नाही. आम्हाला राजेशाही चालेल; पण हुकूमशाही नको आहे.

'अशा परिस्थितीत आज इराणी जनतेसमोर तसंच या जनतेच्या नेत्यांसमोर एक मोठं प्रश्नचिन्ह उभं आहे. त्या दृष्टीने आमच्या संघटनेसारख्या डाव्या विचारसरणीच्या गटांना निश्चितच वाव आहे.

'आणखी ३१ वर्षांनी इराणमधील पेट्रोलचे साठे संपणार आहेत, ही तुमची माहिती खरी आहे; पण त्यामुळे एकंदर भू-भागापैकी दोनतृतीयांश प्रदेश वाळवंटी असलेल्या या देशात हाहा:कार उडेल, असं आम्हाला वाटत नाही. कारण तांब्याच्या उत्पादनांच्या बाबतीत सध्या संशोधन चालू आहे आणि पेट्रोलची जागा घेऊ शकेल इतक्या प्रचंड प्रमाणात इराणमध्ये तांबं हा धातूही उपलब्ध होण्याच्या भरपूर hopes आहेत. युरेनियम हा धातूही इराणमध्ये मुबलक प्रमाणात सापडतो. याव्यतिरिक्त इतर उद्योगधंदे आणि शेती आहेच. थोडक्यात इराणच्या कोणत्याही शासनाला resources कधीच कमी पडणार नाहीत. फक्त कुणी तरी त्यांचा वापर देश विकायला करण्यापेक्षा राष्ट्रहिताच्या दृष्टीने करण्याची आज आवश्यकता आहे.'

या तरुण इराणी विचारवंताशी बोलताना अनेक गोष्टी जाणवत होत्या. तो आज त्रस्त आहे, चिंताग्रस्त आहे. त्याला भविष्याची ओढ आहे; पण वर्तमानाविषयीच तो साशंक आहे. त्याच्याजवळ देशातील सद्य:स्थितीवर कित्येक कल्पना आणि उपायही आहेत आणि तो संधीचीही वाट पहातोय; पण इराणमधल्या सध्याच्या पेचप्रसंगामुळे मात्र तो भांबावून गेलेला आहे. आपल्याजवळच्या कल्पना आणि उपाय या सध्याच्या पेचप्रसंगातून मार्ग काढू शकतीलच, असा आत्मविश्वास आज त्याच्याजवळ दिसत नाही. थोडक्यात, आज मात्र त्याची स्थिती—

Nor certitude, nor peace, nor help, nor pain;
And we are here as on a darkling plain,
Swept with confused alarms of struggle and flight,
Where ignorant armies clash by night.

अशीच आहे.

□

□ □ □

With Best Compliments
From :

VINASTAB

265 A to Z Industrial Premises
Ganpatrao Kadam Marg, Lower Parel
BOMBAY – 400 013.

Phone : 376107 Gram : VINYLCHEM

# क्रांतिकारी संघटनेचे कार्य

शहाविरोधी आंदोलनात शहाच्या सैन्याशी बंदुका, मशिनगन्स, पिस्तुलं, बाँब यांचा वापर करून लढणाऱ्या क्रांतिकारकांचीही एक संघटना इराणमध्ये अस्तित्वात आहे. या संघटनेतील एका नेत्याने संघटनेच्या कार्यपद्धतीविषयी दिलेली पुढील मुलाखत 'अल्-इदाफ' या PFLP च्या साप्ताहिकात प्रसिद्ध झाली होती. त्यावरून या संघटनेच्या कार्याची कल्पना येईल.

प्रश्न : तुम्ही संघटनेसाठी सभासद कसे निवडता ?

उत्तर : एखाद्या माणसाचा परिचय झाल्यानंतर त्याच्याशी आम्ही संबंध वाढवू लागतो. त्यातून तो माणूस कितपत जबाबदार आणि विश्वासार्ह आहे याचा अंदाज येतो. त्या माणसाबद्दल पुरेसा विश्वास वाटायला लागल्यावर त्याला संघटनेची काही लहान लहान कामं सांगायला लागतो. ही कामं म्हणजे त्या नवोदित माणसाच्या कार्यक्षमतेची चाचणीच असते. त्यामध्ये जर तो समाधानकारक वाटला तर त्याच्याशी राजकीय विचारप्रणालीबाबत सविस्तर चर्चा आम्ही करतो. या चर्चांमधून त्या माणसाच्या विचाराचा कल लक्षात येऊ शकतो. या काळात त्याला काही काळ समाजाच्या विविध अंगांमध्ये काम करावं लागतं आणि त्यातही जर तो समाधानकारक वाटला तरच त्याला संघटनेचा सभासद करून घेण्यात येते.

प्रश्न – इराणियन चळवळीमध्ये राजकीय नेतृत्व आणि तुमच्या या गनिमी हल्ल्यांचं नेतृत्व या दोन नेतृत्वांमध्ये भिन्नता होती की ती एकच होती ?

उत्तर – इराणमध्ये Political-military leadarship ही एकच आहे; पण त्यातही प्राधान्य राजकीय नेतृत्वाला आहे आणि त्याला आमच्यासारख्या क्रांतिकारी संघटनेचं पाठबळ आहे.

इराणमधील क्रांतिकारी संघटनेचं एक प्रमुख वैशिष्टय म्हणजे इथे सामूहिक नेतृत्व आहे. ज्याला आपण 'पुढारी' म्हणतो असा एकही माणूस आमच्यात नाही. फक्त जे जास्त अनुभवी असतात ते लढ्याचं मार्गदर्शन करतात.

सामुदायिक नेतृत्वाबरोबरच या क्रांतीचं आणखी एक वैशिष्टय म्हणजे तिच्यातून एक 'नवा माणूस' निर्माण करण्याचं आमचं स्वप्न आहे. व्हिएटनामपासून आम्ही हा धडा घेतला आहे की, क्रांती जर यशस्वी आणि चिरशाश्वत करायची असेल तर त्यासाठी देशातला सामान्य माणूस क्रांतीच्या केंद्रस्थानी असणं आवश्यक आहे. म्हणूनच या सबंध चळवळीत माणसाचा रोल आमच्या दृष्टीने सर्वांत जास्त महत्त्वाचा आहे.

प्रश्न – तुमची हल्ल्यांची उद्दिष्टं तुम्ही कशी ठरवता ?

उत्तर – आमचा हा लष्करी लढा मूळ राजकीय लढ्याला पाठिंबा म्हणून असल्यामुळे हल्ल्याची उद्दिष्टं ठरवणं हा एक राजकीय स्वरूपाचा निर्णय असतो. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीनुसार ती ठरत असतात.

उदाहरणार्थ या लढ्याच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे १९७१-७३ या वर्षांत जिथे दडपशाही चालते अशा कोणत्याही ठिकाणी जाऊन हल्ला करणे किंवा औद्योगिक केंद्रावर हल्ला करणे एवढंच आमचं उद्दिष्ट असे; पण आता पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण targets निवडली जातात. आता कोणत्याही कृतीमधून एखाद्या गटाचं किंवा समाजातील एखाद्या वर्गाचं हित निश्चितपणे साधलं जाईल, याची दक्षता घेतली जाते. मग काही ठिकाणी कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी काही कृती होते, तर काही ठिकाणी संप करणाऱ्यांना साथ देऊन भांडवलदारांची झोप उडवून दिली जाते, तर काही वेळा सिक्युरिटी ऑफिसर्स किंवा छळवणूक करणारे पोलिस-अधिकारी आमच्या तडाख्यात सापडतात. मध्यंतरी तर जाइन चीट टेक्सटाइल्स मिल्सच्या फत्तेह याझदी या मालकालाच आम्ही उडवलं.

प्रश्न : तुमच्या युनिटचं अंतर्गत काम कसं चालतं ?

उत्तर : युनिटमधील प्रत्येक माणसाजवळ शस्त्र असतं आणि पुरेसा दारुगोळाही असतो. हे सगळं सतत चोवीस तास तो बाळगतो. कारण कुठल्याही क्षणी त्याला हल्ल्याचा आदेश दिला जाणार असतो. त्यामुळे त्या दृष्टीनं सज्ज असणं आवश्यक असतं. रात्रीच्या वेळी पहाराही चालू असतो. युनिटमधील प्रत्येक स्त्री-पुरुष कॉमरेडला त्याचे त्याचे पहाऱ्याचे तास वाटून दिलेले असतात. प्रत्येक माणसाला रोज साधारणतः पाच ते सहा तास झोप मिळते. अर्थात झोपेतही अंगावरील शस्त्रास्त्रं आम्ही उतरवून ठेवत नाही. कारण कुठल्याही क्षणी प्रसंगाला तोंड द्यायची तयारी असावी लागते. घरामधली कागदपत्रंही त्याच्या त्याच्या कमीजास्त महत्त्वानुसार ठेवलेली असतात, ज्यायोगे काही धोका निर्माण झालाच तर ती पळवून तरी नेता येतात किंवा जाळून तरी टाकता येतात.

सकाळी उठण्याची वेळ मात्र सगळ्यांची एकच असते. नंतर सबंध युनिट काही व्यायाम करतं. बहुतेक युनिटमध्ये स्त्री-पुरुष एकत्रच राहातात. तसंच प्रत्येक युनिटचा राजकीय शिक्षणाचा स्वतंत्र कार्यक्रम असतो. तो युनिटच्या संघटनात्मक आणि इतर जबाब-

दाऱ्यांबरोबरच पण स्वतंत्रपणे पार पाडायचा असतो.

जो सर्वांत जास्त अनुभवी असेल त्याला युनिटचा नेता किंवा जबाबदार माणूस मानलं जातं. तसंच खालच्या थरातून कामगारांमधून नेतृत्व पुढे आणण्याचा आवर्जून प्रयत्न केला जातो.

प्रश्न : आम्ही असं ऐकलं आहे की, तुमच्या क्रांतिसेनेतील सैनिक त्यांच्याकडील दारूगोळा जर संपला किंवा ते शत्रूच्या हाती पडण्याची भीती निर्माण झाली तर सायनाइड घेऊन किंवा मशिनगनमधील शेवटची गोळी स्वतःला मारून घेऊन आत्महत्या करतात, हे खरं आहे का ?

उत्तर : 'The crucified is crucified on the cross of his faith' अशी एक पर्शियन म्हण आहे. आमच्या क्रांतिसेनेतील सैनिक याचं खरंखुरं प्रतीक आहेत. आमच्या संघटनेतील कोणत्याही माणसाला संघटनेचा पूर्ण सदस्य करून घेऊन, शस्त्रास्त्रं त्याच्या हातात ठेवण्याआधीच त्याला सायनाइड दिलं जातं. त्यामुळं, एकदा या संघटनेचं सदस्यत्व पत्करल्यानंतर कोणत्या कठीण परिस्थितीला तोंड द्यावं लागणार आहे, याची त्याला सुरुवातीलाच जाणीव होते. आमचं असं मत आहे की, We must sacrifice every thing to gain every thing.' त्यामुळे आमचे कॉम्रेडस स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आपलं जीवनच ओवाळून टाकतात. ही आत्महत्या म्हणजे काही रोमँटिक प्रकार नाही, तर ती एक संघटनेच्या कार्यातील आवश्यक गोष्ट आहे.

गेल्या काही वर्षांच्या अनुभवांवरून आमच्या असं लक्षात आलं की, पकडल्या जाणाऱ्या प्रत्येक सैनिकाचा आधी अमानुष छळ करून मगच त्याला ठार मारलं जातं. बऱ्याच वेळा हा छळ सहन न होऊनच तो मरतो. तेव्हा यापेक्षा शत्रूच्या हाती जिवंत न सापडणंच अधिक हितावह असतं. आत्महत्या केल्यामुळं तो सैनिक स्वतःला या छळापासून वाचवू शकतो, तसंच त्याचा छळ केल्याचा जो आसुरी आनंद शत्रूला मिळणार असतो तोही मिळत नाही. किंबहुना, आत्महत्येच्या या मार्गामुळे आम्ही संघटनेच्या कार्याची गुपितं तशीच ठेवू शकतो आणि आम्हाला हाल हाल करून ठार मारण्याचा शहाच्या हस्तकांचा डावही उधळून लावू शकतो.

प्रश्न : अशा तऱ्हेच्या क्रांतिकारी चळवळीचा तुमचा अनुभव काय आहे ?

उत्तर : अगदी पाच वर्षांपूर्वीसुद्धा आम्हाला या चळवळीचा काहीच अनुभव नव्हता. उघड चकमकी आणि शहाच्या सैन्याकडून जबरदस्त दडपशाही यामुळे अशा तऱ्हेचा गुप्त लढा देण्याची संधीच आम्हाला कधी मिळाली नाही. आम्हाला अगदी शून्यापासूनच सुरुवात करायची होती. पण यामुळं झालं असं की, सुरुवातीच्या काळात आमचे बरेच कॉमरेडस् आणि नेते हकनाक बळी गेले. पहिल्याच वर्षी आमच्यातील जवळजवळ दीडशे जणांनी हौतात्म्य स्वीकारलं आणि संघटनेतील एकूण सदस्यांची संख्या पाहाता हा आकडा फारच जास्त होता. पण आमच्या कॉमरेडस्च्या त्या रक्तातून जो अनुभव मिळाला त्यातून गुप्त लढ्यातील कित्येक महत्त्वाच्या गोष्टी आम्ही शिकलो आणि अशा तऱ्हेच्या विविध प्रकारच्या अनुभवांमधूनच आमचा हा लढा समृद्ध होत जाणार आहे, याची आम्हाला खात्री आहे. ☐

---

मोहमद् रेझा शाह पहलवी हा मध्यम उंचीचा, रुंद खांदे असलेला, देखणा, राजबिंडा पुरुष आहे. थोडेसे अकालीच पिकलेले केस सोडता वयाच्या मानाने तो अजूनही तरुणच वाटतो.

शहाला संगीत आणि क्रीडा या दोन प्रकारांमध्ये फार रस आहे. त्याला इराणी संगीत तर आवडतंच, पण अभिजात पाश्चिमात्य संगीताचाही तो भोक्ता आहे. खेळांपैकी टेनिस, व्हॉलीबॉल, पोहणं यातही शहा प्रवीण आहे. तसंच बर्फावरचं स्केटिंगही त्याला फार आवडतं. गोल्फ किंवा शिकार करणं हे खास राजेशाही खेळही शहा मनसोक्त खेळतो. विमान चालवण्यातही तो प्रवीण असून, आताच १६ जानेवारीला देशत्याग केल्यावर इराण ते इजिप्त प्रवासात त्याने स्वतःच विमान चालवलं.

आश्रफ ही त्याची जुळी बहीणही शहाच्या सहवासात नेहमी असते. रेझा सायरस या आपल्या सर्वांत थोरल्या मुलाला युवराजपद आणि फराह या आपल्या पत्नीला शहाने २६ ऑक्टोबर १९६७ रोजी स्वतःच्या अठ्ठेचाळिसाव्या वाढदिवशी इराणचं सम्राज्ञीपद बहाल केलं आहे. एके काळी शहावर प्रेम करणाऱ्या त्याच्या जनतेने शहाला 'आर्यमेहर' हा किताब दिला. त्याचा अर्थ 'आर्यांचा प्रकाश' असा आहे. कारण इराणी जनता स्वतःला आर्यांचे वंशज समजते. इसवी सनापूर्वी २५०० ते २००० आणि १५०० ते ९०० या काळात आर्य मध्य आशियातून कास्पियन सागराजवळील या प्रदेशात येऊन स्थायिक झाले. त्यांच्यावरून या देशाला इराण – आर्यांची भूमी-हे नाव पडले.

☐

# शहाचे राज्यारोहण

शहाच्या राज्यारोहणाच्या वेळी फार मोठा समारंभ झाला. सबंध देशात एखाद्या राष्ट्रीय उत्सवाचं वातावरण निर्माण झालं होतं.

ज्या हॉलमध्ये हा समारंभ पार पडला त्या हॉलच्या सर्व बाजूंना भव्य आरसे लावलेले होते आणि झुंबरं सोडलेली होती. ठरलेल्या वेळी शहा, त्याची पत्नी आणि ज्येष्ठ पुत्र हे तिघंही स्वतंत्रपणे मिरवणुकीने हॉलमध्ये आले आणि व्यासपीठावर गेले. वाद्यांचा आणि घोषणांचा एकच जल्लोष झाला. शहा रत्नांनी मढवलेल्या आपल्या नादिरसिंहासनाजवळ जाऊन उभा राहिला. त्याच्या उजव्या बाजूला त्याची पत्नी उभी राहिली आणि डाव्या बाजूला ज्येष्ठ पुत्र उभा राहिला. शाही वस्त्रं, शिरपेच, तलवार आणि मुकुट घेऊन शहाचे सैनिक पुढे झाले. शहाने स्वतःच्या हातानेच ते सारे परिधान केले. इतर राजेशाहीप्रमाणे मुकुट धारण करण्यास पोप, बिशप, मुल्ला यांपैकी कोणाचंही पौरोहित्य शहाला आवश्यक वाटत नसे. आपल्याला प्रजेचा पाठिंबा आहे, याचं निदर्शक म्हणून शहा स्वतःच्या हातानेच मुकुट डोक्यावर ठेवतो.

त्यानंतर रत्नांनी मढवलेला, अतिशय तेजस्वी असा मुकुट शहाने आपल्या पत्नीच्या डोक्यावर ठेवला आणि तिला इराणचं सम्राज्ञीपद बहाल केल्याचं जाहीर केलं. तसंच आपल्या ज्येष्ठ पुत्राला युवराजपद बहाल केल्याचंही जाहीर केलं. यानंतर १०१ तोफांची सलामी झाली. याच वेळी वाद्यवृंदावर प्रार्थना वाजविली जात होती. शहाचं उपस्थित प्रजाजनांना उद्देशून भाषण झालं. आपल्या भाषणात तो म्हणाला,

'या देशाची आणि इथल्या जनतेची संपन्नता वाढवणं हेच मी माझ्या आयुष्याचं ध्येय मानलं आहे. इराणचं स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व टिकविण्यासाठी मी माझं जीवन व्यतीत करीत आहे, करणार आहे. या देशाचं प्राचीन वैभव आणि ऐतिहासिक महत्त्व त्याला पुन्हा प्राप्त व्हावं, तसंच जगातील अत्यंत पुरोगामी आणि संपन्न राष्ट्रांमध्ये इराणची गणना व्हावी, म्हणून मी सदैव प्रयत्नरत आहे. हे करीत असताना वाटेल ती किंमत देण्याची माझी तयारी आहे–अगदी माझ्या आयुष्याचीसुद्धा !

'आज या सिंहासनावर जगातील एका अत्यंत प्राचीन राजसत्तेचा मुकुट धारण करून मी बसलेलो असताना माझं हृदय आनंदाने उचंबळून येत आहे. विशेषतः इराणच्या इतिहासात प्रथमच शहाच्या पत्नीला आज सम्राज्ञीपद प्राप्त झालेलं आहे. माझ्या दृष्टीने ही गोष्ट अभिमानास्पद आहे.

'आज मी माझ्या देशाशी एका तुटू न शकणाऱ्या धाग्याने बांधला गेलो आहे आणि मला हे जाणवत आहे की, माझ्या प्रजेबरोबर हातात हात घालून हा देश संपन्न, समृद्ध आणि सुखी करण्यासाठी एक नवी वाटचाल आजपासून सुरू होत आहे.'

उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटात आणि विजयी घोषणांमध्ये शहाच्या भाषणाचे शेवटचे शब्द विरून जात होते. पुन्हा एकशेएक तोफांची सलामी झाली.

शहा, सम्राज्ञी फराह व युवराज रेझा सायरस व्यासपीठावरून खाली उतरले आणि एका निळसर सोनेरी रथामध्ये बसले. गोलेस्तान पॅलेसमधून तीन मैलांच्या शोभायात्रेला सुरुवात झाली. तेहरानमधील रस्त्यारस्त्यांवर नुसता जल्लोष उडाला होता.

अकरा वर्षांपूर्वी इराणमध्ये झालेल्या या समारंभावरून इराणमध्ये राजसत्तेला केवढे महात्म्य आणि प्रतिष्ठा आहे हे लक्षात येईल. शहाचं भाषणही नोंद घेण्यासारखं आहे. आपल्या बोलण्यामधून तो असा काही तरी भास करून देत आहे की, शहा म्हणजे ईश्वराचा प्रेषितच असून दीनदुबळ्या, क्षुद्र इराणी जनतेचा उद्धार करण्यासाठी तो या पृथ्वीतलावर अवतरलेला आहे.

समारंभाची भव्यता आणि ती वाढवण्यासाठी होणारा लाखो डॉलर्सचा चुराडा याचा विचार केला म्हणजे बेकारी, रोगराई, उपासमार यांनी गंजलेली इराणी जनता आणि शहाचे हे पैशाची वारेमाप उधळपट्टी करून साजरे केले जाणारे दीक्षा-समारंभ यांची तुलना रोम जळत असताना फिडल वाजवत बसणाऱ्या निरोशी किंवा 'If you don't have bread, eat cakes,' असं उपाशी फ्रेंच जनतेला उद्दामपणे सांगणाऱ्या फ्रान्सच्या राणीशीच करावीशी वाटते.

पण हेही खरंच की, शहाच्या विनाशाची बीजं अशाच प्रसंगांमधून आणि वर्तनातून पेरली जात होती. □

प्रसिद्ध झाले

टॉलस्टॉय – एक माणूस

लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

मूल्य पंचावन्न रुपये

आवृत्ती दुसरी

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.